दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला सात वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा

वर्धा : अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला सात वर्षांच्या सश्रम कारावाससह २० हजार रुपये आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. हा निकाल जिल्हा न्यायाधीश- १ तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश एस.ए. एस. एम. अली यांनी दिला.

आरोपी जयराम तुकाराम मुळे, रा. आर्वी नाका, वर्धा यास कलम १० बाल लैगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ७ वर्षाचा सश्रम कारावास, २० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास अतिरीक्त १ वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. घटनेची थोडक्यात हकीगत अशी की, खेळण असलेल्या पीडितेला आई बोलवत असल्याचे सांगून आरोपीने सोबत नेले. आरोपीने ब्लेडचा धाक दाखवून मारण्याची धमकी देत पीडितेसोबत बळजबरी केली. याप्रकरणी तक्रारीवरून वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा तपास पोलीस उप-निरिक्षक प्रिती आडे पोक्सो सेल वर्धा यांनी केला. आरोपीने गुन्हा केल्याचा सबळ पुरावा उपलब्ध झाल्यामुळे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. सरकारतर्फे अतिरीक्त सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी कामकाज पाहिल. अँड. स्वाती गेडे यांनी त्यांना कामकाजात मदत केली. पैरवी अधिकारी पोलीस हवालदार राहुल पुरी यांनी साक्षदारांना न्यायालयात हजर करून कामगीरी बजावली. प्रकरणात शासनातर्फे ९ साक्षीदार तपासले.

*(आष्टी) वर्धा *गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ *वर्ष ४ थे *अंक २१७ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

तरुण पिढीला नशेच्या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नशामुक्त महाराष्ट्र धोरणाबाबत सादरीकरण बैठक

मुंबई : तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रवृत्तींना प्रतिबंधित करावे. तरुणांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना सहानुभूतीने या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नशा मुक्त महाराष्ट्र धोरण सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत दिले.

नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणाचा दृष्टिकोन महत्वाचा ठरणार आहे. सर्व संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून प्रभावी भूमिका बजाविल्यास पुढील काळात निश्चितच नशामुक्त महाराष्ट्र घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. बैठकीला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरुणांना यामधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती केंद्र कार्यान्वित करावीत. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात यावे. यासाठी आवश्यकता असल्यास निधीची तरतूद करण्यात यावी. या केंद्रांच्या माध्यमातून नशामुक्तीचे प्रभावी कार्यान्वयन होण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली विकसित करावी. नशामुक्त झालेली तरुणाई पुन्हा नशेच्या गर्तेत जाऊ नये,



यासाठी नशा मुक्ती केंद्रांच्या साखळीसोबतच त्यास कारणीभूत ठरत असलेल्या घटकांवर नियंत्रण आणावे.

शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर टपरीमुक्त असावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर हा टपरीमुक्त असावा. याबाबत कुटल्याही तडजोड करता कामा नये. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर हा अमली पदार्थ मुक्त असावा. संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक आस्थापनेचा कॅम्पस अमली पदार्थ मुक्त घोषित करण्याची कार्यवाही करावी. शालेय शिक्षणात अमली पदार्थांचे दुष्परिणाम यावर आधारित अभ्यासक्रम समावेशाची कार्यवाही पूर्ण करावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ?क्ट) सारख्या कायद्यांचा प्रभावी उपयोग करीत गतीने निकाल्याची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावी. यासोबतच अशा गुन्ह्यांच्या निपटाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोत्यांच्या पॅनलची व्यवस्था करावी. हे पॅनल राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत नियुक्त करण्याची तरतूद असावी. नशामुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी संपूर्ण शासकीय यंत्रणेचा सर्वसमावेशक दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवत अमली पदार्थांशी निगडित संपूर्ण परिसंस्थेवर नियंत्रण आणावे. समाजामध्ये अंमली पदार्थ विषयी जनजागृती करण्यासाठी जगातील यशस्वी पद्धतींचा अभ्यास करीत प्रभावी संदेश प्रणाली विकसित करावी. नशेच्या दुष्टचक्रात चुकीने आलेल्या तरुणांना कुठेही गुन्हेगार असल्याचे मानसिकता तयार होऊ देऊ नये. त्यांना नशामुक्ती केंद्राच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक आयुष्याचा अनुभव द्यावा. नैसर्गिक अमली पदार्थ उत्पादन करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

तरुणांमध्ये नशा करण्याची लक्षणे आढळल्यास त्वरीत तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अमली पदार्थविरोधी कारवाईमध्ये जिल्हास्तरीय समित्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या समित्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यात यावे. त्यांच्या कामगिरीच्या आधारावर जिल्ह्याची रँकिंग पद्धत विकसित करावी. तसेच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय 'एन कॉर्ड ' शिखर समितीची स्थापना करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीत अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, अमली पदार्थ विरोधी कृती दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात अमली पदार्थांच्या विरोधातील कारवाई

२०२३ मध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस अॅक्ट) अंतर्गत ८९७ कोटी रुपये किमतीचे ४३ हजार ६३२ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. तर २०२५ मध्ये जप्तीच्या कारवाई मध्ये २०२३ च्या तुलनेत २९ टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे. यावर्षी ५६ हजार २०६ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत १ हजार ३४० कोटी रुपये किंमत आहे. किमतीच्या दृष्टिकोनातून ४९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

प्रेमसंबंधात पती अडथळा ठरत असल्याने पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीची गळा आवळून केली हत्या

दुसरा मर्डरने शेकापूर हादरले

हिंगणघाट : तालुक्यातील शेकापूर बाई प्रेमसंबंधात पती अडथळा ठरत असल्याने पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर मृतदेह गावाजवळील विहिरीत फेकून दिला. एवढ्यावरच हा प्रकार थांबला नाही, तर पती बेपत्ता असल्याची तक्रारही पत्नीनेच पोलिसांत दाखल केली; मात्र, पोलिसांच्या तपासात या संपूर्ण हत्याकांडचा उलगडा झाला. शेकापूर बाई, ता. हिंगणघाट येथे घडलेल्या या धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, पत्नीसह चौघांना वडनेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



संतोष पांडुरंग केकाळे (वय ४२) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांमध्ये दाखल फिर्यादीनुसार, संतोष यांची पत्नी सपना केकाळे हिचे संतोष यांचेच चुलत भाऊ शुभम केकाळे यांच्यासोबत प्रेमसंबंध होते. या संबंधात संतोष अडथळा ठरत असल्याने त्यांचा काटा काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

मध्यरात्री घरातच घडला प्रकार

१६ ऑगस्टच्या मध्यरात्री साडेबारा ते दीडच्या दरम्यान संतोष यांच्या राहत्या घरी हा प्रकार घडल्याचे पोलीस तपासातून समोर आले आहे. सपना हिने प्रियकर शुभम केकाळे आणि त्याचे दोन साथीदार सचिन वसुणे व प्रशांत कप्पे यांच्या मदतीने संतोष यांचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो गावाजवळील बोडके यांच्या विहिरीत फेकून देण्यात आला.

हत्येनंतर पत्नीचेच मिसिंग तक्रार

हत्येनंतर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. संतोष बेपत्ता असल्याचे भासवून पत्नी सपना हिनेच वडनेर पोलीस ठाण्यात त्यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली; मात्र, पोलिसांना या प्रकरणातील काही बाबींवर संशय आला. त्यामुळे तपासाची दिशा बदलण्यात आली. संशयितांची चौकशी आणि उपलब्ध माहितीच्या आधारे तपास पुढे नेताना प्रेमसंबंधाचा धागा पोलिसांच्या हाती लागला. त्यानंतर हत्याकांडाचा संपूर्ण घटनाक्रम उलगडत गेला.

?चुलत भावानेच केला विश्वासघात

या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे संतोष आणि शुभम हे चुलत भाऊ आहेत. एकीकडे रक्ताचे नाते आणि दुसरीकडे संतोष यांच्या पत्नीशी असलेले प्रेमसंबंध, या पार्श्वभूमीवरच हत्येचा घटनाक्रम घडल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

?या प्रकरणी देवानंद पांडुरंगजी केकाळे (वय ५०) रा. शेकापूर बाई यांच्या फिर्यादीवरून वडनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी शुभम रमेशराव केकाळे (३०), सचिन प्रभाकर वसूणे (३०), प्रशांत रमेश कप्पे (३६) आणि सपना संतोष केकाळे (३६) या चौघांना ताब्यात घेतले आहे. हत्येचा नेमका घटनाक्रम, कटाची आखणी आणि प्रत्येकाची भूमिका याबाबत पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल कुमार गायक, परिक्षेपाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी गोविंद गवारी, पोलीस निरीक्षक घनंजय पाटील, पोलीस उपनिरीक्षक भारत वर्मा तसेच पोलीस पथकाने केली.

प्रेमसंबंधातून पतीची हत्या, मृतदेहाची विहिरीत विल्हेवाट आणि त्यानंतर पत्नीचेच पती बेपत्ता असल्याची तक्रार देण्याचे या प्रकरणाने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. आता पोलिसांच्या पुढील तपासात या हत्याकांडामागील आणखी कोणती माहिती समोर येतात, याकडे लक्ष लागले आहे.ब्युरो रिपोट तालुका प्रतिनिधी हिंगणघाट

पिपरी पुनर्वसन ग्रामपंचायतीतील तक्रारीची २४ ऑगस्टला विभागीय आयुक्तांसमोर अंतिम सुनावणी

आर्वी : पिंपरी पुनर्वसन ग्रामपंचायतीचे सरपंच राजेश शिरधरे आणि ग्रामसेवक करुणा सोनवणे यांच्या कारभाराविरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३९ (१) नुसार कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी पीरिपाचे जिल्हाध्यक्ष मेघराज डोंगरे यांनी विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे याचिका दाखल केली आहे. या प्रकरणाची अंतिम सुनावणी २४ ऑगस्ट २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात होणार आहे. याचिकेत मागासवर्गीय वस्ती व वैयक्तिक लाभ निधी नियमानुसार खर्च न करणे, महिला व बालकल्याण तसेच दिव्यांगांसाठी तरतुदीनुसार खर्च न करणे आदी आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी कारंजा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.या प्रकरणावर २४ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात अंतिम सुनावणी होणार असल्याने पिपरी भाईपूर पुनर्वसन ग्रामपंचायतीच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष या सुनावणीकडे लागले आहे.

मतदार यादीचे पुनरिक्षण : जिल्ह्यात ८४ टक्के गणना पत्रक भरुन जमा

गैरहजर, स्थलांतरीत, दुबार, मृत मतदार १ लाख ७८ हजार; गणना प्रपत्र जमा न केलेल्या मतदारांच्या याद्या संकेतस्थळावर

वर्धा(जिमाका) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील आर्वी, देवळी, हिंगणघाट व वर्धा विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी अंतिम मुदतीत १७ ऑगस्ट पर्यंत घरोघरी भेट देऊन स्वाक्षरीसह गणना पत्रक भरुन घेतले. या कामात जिल्ह्यात ८४.३४ टक्के काम पुर्ण झाले आहे.

जिल्ह्यात ११ लाख ३७ हजार २४२ इतके मतदार असून त्यापैकी ९ लाख ५९ हजार १११ इतक्या मतदारांचे गणना पत्रक स्वाक्षरी होऊन प्राप्त झालेले आहेत. यामध्ये आर्वी विधानसभा मतदार संघातील ३१० मतदान केंद्रातील २ लाख ६४ हजार ८५७ मतदारांपैकी २ लाख २७ हजार ५७६ गणना पत्रक, देवळी विधानसभा मतदार संघातील ३३५ मतदान केंद्रातील २ लाख ७२ हजार ६१ मतदारांपैकी २ लाख २६ हजार ४३३ गणना पत्रक, हिंगणघाट विधानसभा मतदार संघातील ३५१ मतदान केंद्रातील ३ लाख ४०४ मतदारांपैकी २ लाख ५२ हजार ५३४ गणना पत्रक व वर्धा विधानसभा मतदार संघातील ३४६ मतदान केंद्रातील २ लाख ९९ हजार ९२० मतदारांपैकी २ लाख ५२ हजार ५६८ मतदारांचे गणना पत्रक भरुन व स्वाक्षरी घेऊन जमा करण्यात आले आहे.मतदारांच्या गृहभेटीनंतर १ लाख७८ हजार १३१ (१५.६६ टक्के)इतके मतदार गणना पत्रक जमा न होणे या प्रवर्गात नोंदविण्यात आले आहे. यामध्ये आर्वी सापडू न शकलेले गैरहजर ३ हजार ५२२, कायस्वरुपी स्थलांतरीत २० हजार ६६८, अन्यत्र नोंदणी केलेले/दुबार ४ हजार १६९, मृत ८ हजार८७४, इतर ४८ असे एकुण ३७ हजार २८१ मतदार आढळून आले. देवळी मध्ये सापडू न शकलेले गैरहजर १ हजार ३०४, कायमस्वरुपी स्थलांतरीत २२ हजार ८०९, अन्यत्र नोंदणी केलेले/दुबार ९ हजार १८, मृत १२ हजार ४२५, इतर ७२ असे एकुण ४५ हजार ६२८ मतदार आढळून आले.हिंगणघाट मध्ये सापडू न शकलेले गैरहजर ४ हजार ११०, कायमस्वरुपी स्थलांतरीत २४ हजार ९०७, अन्यत्र नोंदणी केलेले/दुबार ४ हजार ३८८, मृत १४ हजार ४०६, इतर ५९ असे एकुण ४७ हजार ८७० मतदार आढळून आले. वर्धामध्ये सापडू न शकलेले गैरहजर १ हजार ३६७, कायमस्वरुपी स्थलांतरीत २६ हजार ७३५, अन्यत्र नोंदणी केलेले/दुबार ७ हजार १९८, मृत ११ हजार ९७२, इतर ८० असे एकुण ४७ हजार ३५२ मतदार आढळून आले. जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार क्षेत्रातील ११ लाख ३७ हजार मतदारांना १०० टक्के गणनापत्रक वितरीत करण्यात आले असून गणना पत्रक जमा न झालेल्या नावाच्या याद्या संबंधित मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडून मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढे/ँ्ँदन-रह/हा/जमे-ऱ्हाहेनन्ी-नेन्मेदह-२०२६ँ्-न्दी-लूँ्हू-पी-ूँ्-ल्ज्रमूँ्/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

मृद व जलसंवर्धनासाठी महा वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा

उद्या मृद व जलसंधारणाचा जागर, हजारोंचा सहभाग आंबेडकर चौकात शपथ व वॉकेथॉनचा शुभारंभ यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे गठण

वर्धा (जिमाका) : मृद व जलसंधारणाच्या जनजागृतीसाठी दि.२१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वॉकेथॉन नागरिक, विद्यार्थ्यांच्या सहभागाने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विविध समित्या नेमण्यात आल्या आहे. आज समिती प्रमुखांकडून तयारीचा आढावा घेण्यात आला. वॉकेथॉनच्या माध्यमातून होणाऱ्या मृद व जलसंधारणाच्या जागरमध्ये नोंदणी करून मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वॉकेथॉनची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. माजी मुख्यमंत्री सुधाकररावनाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट



दरम्यान जलसंधारण सप्ताह आयोजित करण्यात येत आहे. सप्ताहनिमित्त महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२१ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकातून मान्यवरांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून महा वॉकेथॉनला सुरुवात होईल. तत्पूर्वी मृद व जलसंधारणाची शपथ होईल. शुभारंभानंतर महात्मा गांधी चौक, शासकीय विश्रामगृह, नगर परिषद, पोष्ट ऑफिस, कारागृह समोरून मार्गक्रमण करत वॉकेथॉन पुन्हा आंबेडकर चौकात येईल व समारोप होईल. वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

वॉकेथॉनलामध्ये लोकप्रतिनिधीसह अधिकारी व कर्मचारी, नामांकित व प्रतिष्ठीत व्यक्ती, डॉक्टर, कलाकार, उद्योजक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेडक्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी व लायन्स क्लब, रनिंग क्लब, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला सहभागी होणार आहे. वॉकेथॉनलामध्ये सहभागी होण्यासाठी https://register.mahaevent.co.in/#/ या लिंकद्वारे किंवा क्युआर कोडद्वारे सहभागी होता येईल, असे प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

संपादकीय

शाळा बंदी + शिक्षक बंदी + शिक्षण बंदी

देशातील ९० हजार आणि महाराष्ट्रातील १८ हजार सरकारी शाळा बंद होणार असल्याची माहिती शासनानेच जाहीर केली. जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या २० पेक्षा कमी असल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले.

नव्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील अनेक शाळांमधील पटसंख्या कमी झाली आहे. अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये पटसंख्या वीसपेक्षा कमी झाली आहे. यामुळे कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद केल्या जाणार आहेत. याबाबत राज्य सरकारकडून अधिकेशनात माहिती देण्यात आली असून राज्यातील १८ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाली आहे. राज्यात जिल्हा परिषदच्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी १८ हजार शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असल्याची नोंद करण्यात आली आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद केल्या जाणार आहेत. याउलट राज्यात आठ हजार गावांत शाळाच नाही, अशी धक्कादायक बातमी वृत्तपत्रांनी दिली आहे. समग्र शिक्षण अभियानाच्या अर्थसंकल्प उरवण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या शिक्षण विभागाची संयुक्त बैठक झाली. त्यात 'युडायस'च्या आकडेवारीनुसार राज्यात ८ हजार २१३ गावांमध्ये शाळांची सुविधा नसल्याचे शिक्षण विभागाने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मान्य केले आहे. १,६५० गावांमध्ये प्राथमिक, १६,५६३ गावे उच्च प्राथमिकविना शिवाय वीज, पाणी, स्वतंत्र शौचालयांचा अभाव राज्यातील ५ हजार ३७३ शाळांमध्ये, ५३० शाळांमध्ये पिण्याचे पाणी, ३ हजार ३३५ शाळांमध्ये मुलींसाठी, तर ५ हजार १२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचे स्पष्ट असताना या शाळांचे समलीकरण करण्याऐवजी १००० शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. १ हजार ६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा, ६,५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे निदर्शनास आले आहे, असे लेखी उत्तर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले आहे.

हे कमी की काय म्हणून कमी पटसंख्येच्या साडेचौदा हजार शाळांवर संक्रांत येणार आहे. कमी पटसंख्येच्या शाळांऐवजी आता समूह शाळांची निर्मिती करण्यासाठी धोरण निश्चित केले आहे. राज्यातील दुर्गम भागांमधील कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'क्लस्टर स्कूल' (समूह शाळा) सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी नंदुरबार येथील तोरणमाळ व पुणे जिल्ह्यातील पानरोत या दोन क्लस्टर स्कूलच्या धर्तीवर राज्यात आता सर्व टिकाणी क्लस्टर शाळा उभारल्या जाणार आहेत. परिणामी कमी पटसंख्येच्या तब्बल १४ हजार ७८३ शाळांवर संक्रांत येणार आहे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रत्येक मुलाला त्याच्या घराजवळ शिक्षण मिळणे अपेक्षित आहे. मात्र राज्यातील अतिदुर्गम भागात कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. त्यामुळेच राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने या विद्यार्थ्यांसाठी व त्यांना विविध शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध होण्यासाठी क्लस्टर स्कूल (समूह शाळा) सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतला. त्यावर अनेक शिक्षण तज्ज्ञांकडून टीकाही झाली. मात्र क्लस्टर शाळा सुरू करण्याचा निर्णयाला राज्य शासनाने हिरवा झेंडा दाखवला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व इतर अभ्यास गटांनी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा उपलब्ध असाव्यात, असे समूह शाळांबद्दल म्हटले जात असले तरी त्या सुविधा कितपत पूर्ण होतील हे सांगणे कठीण आहे. कमी पटसंख्येच्या शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत ने-आण करण्यासाठी शालेय बससाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्री. यासाठी विविध शासकीय निधी, सीएसआरचा वापर करावा. या प्रत्येक बसमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही, जीपीएसी ट्रॅकरची सुविधा असावी व प्रत्येक बसमध्ये बिल्लाधारक चालक व महिला पर्यवेक्षक असावी, यासह इतरही सुविधा देण्याबाबत सुचविण्यात आले आहे, परंतु या सुविधा कागदावर राहतात की प्रत्यक्षात साकार होतात, याबाबतचे भाष्य करण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही.



क्लस्टरच्या माध्यमातून दहा किलोमीटर अंतरावर एक शाळासंकुल उभारण्याचा सरकारच्या भूमिकेमुळे गावातील शाळा बंद होण्याची भीती असून राज्यभरातील १४ हजार ७८३ शाळा समायोजित (बंद) होण्याची शक्यता आहे. या निर्णयाचा परिणाम १ लाख ८० हजार विद्यार्थी आणि ३ हजार शिक्षकांवरही होणार आहे. हे विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी पाडे, दुर्गम भाग व शहरी झोपडपट्टी यातील असणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ज्या गावची शाळा बंद होईल त्या गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे बंद होण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे. कमी पटसंख्येच्या शाळा चालविणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही तसेच तेथील गुणवत्ता टिकवता येत नाही. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणात कमी पटसंख्येच्या शाळा समायोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे, असा याबाबतचा सरकारचा युक्तिवाद आहे.

शिक्षणावरील खर्च कमी- मागील चार वर्षात राज्य सरकारचे उत्पन्न वाढले, परंतु शिक्षणावरील खर्च १८.१ टक्क्यांवरून १६.३ टक्क्यांपर्यंत खाली आला. सतत खर्च कपातीमुळे शाळांची अवस्था बिकट झाली आहे. शिक्षकांची रिक्त पदे, भौतिक सुविधांचा अभाव, अरँशिक्षक कामातून सुटका खेळांचे मैदान व साहित्य त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक आदींची पूर्तता होऊ शकली नाही. त्यामुळे या शाळा आपसूकच गुणवत्ताहीन झाल्या. आता त्या मरणासन्न अवस्थेत आहेत. बंद होण्याच्या मार्गावरील शाळांचे प्रमाण सर्वत जास्त विदर्भात आहे, त्या खालोखाल मराठवाड्यातील आहे. गोंदिया : २१३, भंडारा : १४१, नागपूर : ५५५, चंद्रपूर : ४३७, गडचिरोली : ६४१, वर्धा : ३१८, यवतमाळ : ३५०, अमरावती : ३१४, अकोला : ११३, वाशीम : १३३, हिंगोली : १३, नांदेड : ३१४, बुलडाणा : १५८, परभणी : १२६, लातूर : २०१, धाराशिव : १७४, जालना : १८४, बीड : ५३३, सोलापूर : ३४१, जळगाव : १०७ छत्रपती संभाजीनगर : ३४७, नगर : ६१५, नंदुरबार : १८१, बुळे : १२, पुणे : १०५४, ठाणे : ४४१, पालघर : ३१७, मुंबई : ११७, रायगड : १२१५, सातारा : १०३१, सांगली : ३८५० कोल्हापूर : ५०७, सिंधुदुर्ग : ८३५, रत्नागिरी : १३७५, नाशिक : ३३१ शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे, राष्ट्रीय शिक्षण धोरणाऐवजी राज्य सरकारने स्वतंत्र धोरण तयार करावे. शिक्षण खर्चात वाढ करावी तसेच शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून नियमित शिक्षकांची भरती करावी, असे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, किफायतशीर करिअरच्या संधी मिळाव्यात असे नमूद करायचे, पण दुसरीकडे नेमके याविरुद्ध व्यवहार करायचा, अशी सरकारची भूमिका दिसते. त्यामुळे या व्यवहाराचे दुर्गामी परिणाम आपल्या समाज व्यवस्थेवरती होतील यात शंका नाही.

आज डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिन अभिवादन...!

श्रृंखलापायी असू दे मी गतीचे गीत गाई.... दुःख उधळायास आता आसवांना वेळ नाही...



स्वातंत्र्यासाठी प्राण देणारी अनेक माणसे महाराष्ट्राने याआधी पाहिली. समतेच्या वेदीवरही अनेकांनी प्राणार्पण केले परंतु ज्ञान- विज्ञानाच्या महतीसाठी प्राणाची कुरवंडी ओवाळणारा 'नरेंद्र दाभोलकर' हा पहिला मराठी हुतात्मा आहे.त्यांना आजच्या दिनी विनम्र अभिवादन!

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेली सदतीस वर्षे न थांबता, न थकता, अविश्रांत, अविरतपणे, संघर्षाला सामोरे जात, समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचं आणि त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलनाचं हे विवेकी कार्य सातत्याने आणि संयमाने करत आहे.२० ऑगस्ट २०१३ रोजी डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांचा पुण्यामध्ये अत्यंत निर्दयी पणे खून करण्यात आला आणि महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देश सुन्न झाला. त्याच क्षणी संपूर्ण देशाला पुन्हा एकदा महात्मा गांधींच्या खुनाची आठवण झाली.

सत्य आणि अहिंसा या करता बलिदान देणारा राष्ट्रपिता, आणि समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि अंधश्रद्धांचे निर्मूलन व्हावं याकरता प्राण पणाला लावणारा हुतात्मा यांचे वैचारिक विरोधक एकच आहेत हेही लक्षात आले.

१९४८ ते २०१३ या कालखंडामध्ये महात्मा गांधी आणि दाभोलकर यांच्या वैचारिक विरोधकांच्या मानसिकतेत काहीही फरक पडला नाही याचीही जाणीव झाली.खरं तर डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या विषयी लिहिताना सुरुवात कुठून आणि कशी करावी ? असा प्रश्न पडतो.कारण हे एक अद्भुत आणि अलौकिक व्यक्तिमत्व आहे.म्हणजे बघा, दाभोलकरांना विचारवंत म्हणावं की दार्शनिक, कृतिशील कार्यकर्ता म्हणावं की तत्त्व व्याख्याता, बौद्धिक चिकित्सक म्हणावं की कुशल संघटक, उत्तम लेखक म्हणावं की साक्षेपी संपादक, म्हणजेच डॉक्टर नरेंद्र दाभोलकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व होतं.डॉ. दाभोलकर यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यामध्येइतक्याविविध प्रकारे, विविध गोष्टींना स्पर्श केलेला आहे की आपण थक्क होऊन जातो.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भूमिका मांडताना डॉक्टर नेहमी आणि वारंवार हे सांगायचे की, समिती ही कोणत्याही धर्माच्या किंवा देवाच्या विरोधात नाही.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचं दुसरं नाव आहे 'डोकं चालवा चळवळ'. या चळवळीची वैचारिक भूमिका आणि चतुःसूत्री ही पुढील प्रमाणे आहे.

शोषण करणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या फसवणूक करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे.वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करणे. धर्माची विधायक कठोर आणि कृतिशील चिकित्सा करणे. परिवर्तनवादी भूमिका घेऊन काम करणाऱ्या अन्य समविचारी चळवळींचा सात सहयोग देणे घेणे.याचबरोबर ते सातत्याने संतांच्या धर्मचिकित्सेचा आणि समाज सुधारकांच्या कार्याचा दाखला द्यायचे.संत ज्ञानेश्वर पासून संत गाडगेबाबा पर्यंत, संत जनाबाईपासून संत बहिणाबाई पर्यंत धर्मचिकित्सा करणाऱ्या संतांच्या वारशाचा ते दाखला द्यायचे. तेनेहमी म्हणायचे की, महाराष्ट्राला समाज सुधारकांची प्रबोधनाची उज्वळपास दीडशे वर्षांची परंपरा आहे म्हणजे लोकहितवादी ते प्रबोधनकार ठाकरे लोकहितवादीचा जन्म १८२३ चा आणि प्रबोधनकारांचा मृत्यू १९७३ चा, म्हणजेच सन १८२३ ते सन १९७३ अशी दीडशे वर्षांची समाजसुधारकांची परंपरा ही महाराष्ट्राला लाभलेली आहे.

यापुढे जाऊन चळवळ/ समिती असं म्हणते की डॉक्टरांचा मृत्यू हा २०१३ मध्ये झाला म्हणजे १८२३ ते २०१३ अशी १९० वर्षांची ही प्रबोधनाची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे.

याचवरोबर भारताचे संविधान आणि संविधानातील वैज्ञानिक आणि विवेकी दृष्टिकोन या दोन गोष्टी म्हणजे समितीच्या कार्याचा हा प्रशस्त मार्ग आहे. गेली सदतीस वर्षे समिती ही याच मार्गावरून अत्यंत नेटाने, धैर्याने मार्गक्रमण करीत आहे.

केवळ अंधश्रद्धा निर्मूलन एवढाच विचार न करता समितीने समाजाच्या इतरही विभागांना अत्यंत वेटपणे स्पर्श केलेला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य पुढील विभागांतर्गत विस्तारलेले आहे.बुवाबाजी संघर्ष विभाग, मानसिक आरोग्य विभाग सांस्कृतिक विभाग, वार्तापत्र विभाग व प्रकाशन विभाग, महिला सहभाग विभाग, प्रशिक्षण विभाग, विविध उपक्रम विभाग, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प विभाग, युवा आणि विवेक वाहिनी विभाग, कायदा विभाग, सोशल मीडिया विभाग, जातीअंत आणि आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह सहाय्य विभाग.याचा एकउपयोग अत्यंत महत्त्वाचा आहे की चळवळीमध्ये येणाऱ्या कार्यकर्त्यांना आपल्या आवडीप्रमाणे काम करता यते तसेच कार्यकर्त्यांचा व्यक्तिगत्व विकासालाही आपसूकपणे हातभार लागतो.

ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क'(त्त्यर्ड्ढ इदजन्) एम्माझ पूँदेश-'ब्ध्द्य्') ही भारतातील जनविज्ञान चळवळीची एक राष्ट्रीय संघटना आहे. याची स्थापना १९८८ मध्ये केरळमधील कन्नूर येथे झाली. देशभरात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, अंधश्रद्धा निर्मूलन, विज्ञान लोकप्रिय करणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे हे या नेटवर्कचे मुख्य उद्दिष्ट आहे.यात भारतातील २५ हून अधिक राज्यांमधील सुमारे ४० हून अधिक जनविज्ञान आणि सामाजिक संस्थांचा समावेश आहे.राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस (NSTD): महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या २० ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या हत्येच्या स्मृतीप्रित्यर्थ, AIPSN ने २० ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस' (National Scientific Temper Day) म्हणून घोषित केला आहे.

विज्ञान साक्षरता, प्रौढ शिक्षण, शाळांमध्ये वैज्ञानिक प्रयोग आणि समाज व विज्ञान यांच्यातील संबंधांवर जनजागृती ठळक वैशिष्ट्ये या संस्थेची आहेत.या दिवशी संपूर्ण देशभर"ऍक्ट्य या विचारांचे प्रबोधन, प्रचार आणि प्रसार केला जातो. वामध्ये वैज्ञानिक आणि विवेकी दृष्टिकोन यांविषयी प्रचार आणि प्रसार ही संस्था दरवर्षी करते आहे.समितीच्या कार्याची पोच पावती म्हणजे समितीने आज पर्यंत दोन कायदे महाराष्ट्रामध्ये पारित करून घेतले पैकी पहिल्या कायद्याचं नाव हे जादूटोणा विरोधी कायदा म्हणून प्रचलित आहे. हा कायदा व्हावा याकरता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने अथक प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने डॉक्टरांच्या हयातीत हा कायदा पारित होऊ शकला नाही.

महाराष्ट्र नरवळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा अधिनियम, डिसेंबर २०१३.महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, प्रतिबंध आणि निवारण) अधिनियम, जुलै २०१६.या महाराष्ट्र नरबळी कायदा २०१३ नुसार आतापर्यंत नरबळी, भूत उतरवणे, पैशांचा पाऊस, गुप्तधन, नग्नपूजा अशाप्रकारची बुवाबाजी करणाऱ्याविरोधात राज्यात गेल्या तेरा वर्षांत दोन हजारांपेक्षा अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये पहिला जो भोंदू बाबा पकडला तो मुस्लिम होता. खरंतर समिती हिंदू - मुस्लिम असा भेदभाव करीत नाही. परंतु या कायद्याला विरोध करणाऱ्यांना हे दाखवून द्यावं लागतं, हे खरं तर दुर्दैव आहे.

आम्ही सरे दाभोलकर म्हणण्याचा कार्यकर्त्यांचे मोहोळ तयार करणाऱ्या दाभोलकरांना जाऊन तेरा वर्षे झाली. ते उत्तम कबड्डीपटू होते. बांगलादेशाच्या विरुद्ध खेळताना त्यांची हनुमान उडी गाजली. सामाजिक कृतज्ञता निधीची उभारणी, साधना साप्ताहाकाचे संपादक, लेखन, भाषण अश्या अनेक आघाड्यांवर डॉक्टर कार्यरत राहिले. कुशल संघटक, प्रभावी वक्ते, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त विजेते आणि पद्मश्री अशी ही दाभोलकरांची ओळख आहे.

'तिमिरातून तेजाकडे'...हा त्यांचा ग्रंथ चळवळीचा दस्तऐवज आहे. दाभोलकर हे विज्ञानवादी समाजसेवक होते.' अशी देवा तिमीर नाशा, बुद्धि प्रकाशा विठ्ठला' म्हणजे 'उजेडच अंधारात संपवू शकतो.' अशी निष्ठा बाळगणारे दाभोलकर मूर्तिपूट, प्रवाही बोलणारे उत्तम वक्ते होते.समितीचा युएसपी म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र मासिक.

सुरुवातीपासून कोणताही खंड न पडता आजपर्यंत हे मासिक अव्याहत सुरू आहे. या वार्तापत्रावरूनचे वैशिष्ट्य म्हणजे जानेवारी ते ऑक्टोबर असे दहा महिन्याचे दहा अंक आणि नोव्हेंबर डिसेंबर चा वार्षिक जोड अंक दरवर्षी प्रसिद्ध करते.तसेच प्रकाशन विभागातर्फे आतापर्यंत ५० च्या वर ग्रंथ आणि छोट्या पुस्तिका यांचे प्रकाशन अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राने केलेले आहे.संविधान बांधीलकी महोत्सव, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे कार्यक्रम, पर्यावरण पूरक होळी/ रंगपंचमी, वटपौर्णिमा दिनी वृक्षारोपण, महिला प्रबोधन अभियान, नागपंचमी निमित्त सर्प विज्ञान प्रबोधन व पोस्टर प्रदर्शन, बकरी ईद निमित्त रक्तदान मोहीम, २० ऑगस्ट राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन, फटाके मुक्त दीपावली अभियान, ३१ डिसेंबर व्यसनमुक्त नववर्ष साजरे करणे, पर्यावरण पूरक गणेश उत्सव, आकाश दर्शन कार्यक्रम अशा अनेकस्वरूपी विविध कार्यक्रमांची आखणी समितीद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर आपापल्या शाखेत वर्षभरामध्ये आयोजित केली जाते.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एक जन चळवळ आहे. गेल्या ३७ वर्षांमध्ये समितीने हजारो कथित भोंदू बाबा, बुवा, महाराज, मांत्रिक, भगत, देवस्थानं यांचा पर्दाफाश केलेला आहे.समिती दरवर्षी लहान मोठ्या सुमारे १०० भोंदूबुवा-बाबांचा भांडाफोड करते आणि या भोंदू बुवाबाजी विरोधात सातत्याने प्रबोधन व संघर्ष करते. चमत्कारांचे सादरीकरण व त्यामागील विज्ञान समजावून सांगणे याचे प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम सलग ३७ वर्ष सातत्याने समितीने सुरु ठेवलेले आहेत.महाराष्ट्र नरबळी या कायद्याच्या अंतर्गत वर्षांत पोटगुपारा आणि प्रबोधन समितीने केले, तसेच 'जात पंचायतीच्या मनमानीला मूठ माती' या अभियानानंतर महाराष्ट्र शासनाकडून सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा मंजूर करून घेतला.

समितीने फसवे विज्ञान किंवा छद्म विज्ञानाचे दावे करणाऱ्या विरुद्ध प्रबोधन आणि संघर्ष केला. समितीने निरामय मानसिक आरोग्यासाठी 'मानस मित्र' हाप्रकल्प सुरू केलेला आहे.म.ॲनिसचे माजी अध्यक्ष प्राध्यापक एन डी पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'वैज्ञानिक जाणीवा प्रबोधन अभियान' समिती राबवत आहे.याचबरोबर समितीने आतापर्यंत हजारो महिलांचे 'जटा निर्मूलन' करून त्यांची जाचक कलागत मुक्तता केलेली आहे. अशा प्रकारे समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे व समाज विवेकी करण्याचे काम समिती अथक पणे करते आहे.भारतामध्ये विविध जाती-धर्मांचे लोक राहतात, तसेच ईश्वर मानणारे आणि न मानणारे ही लोक राहतात, आणि मुख्य करून भारतीय संविधानाने प्रत्येकाला आपल्या रूढी परंपरा पाळण्याचे अधिकारी स्वातंत्र्य दिलेले आहे आणि याच अधिक्षमी स्वातंत्र्याचा पुरस्कार 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' सातत्याने करत आलेली आहे आणि म्हणूनच कोणत्याही देवाच्या, धर्माच्या विरोधी भूमिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कधीही घेत नाही, यापूर्वी देखील घेतलेली नाही.समितीच्या या भूमिके मुळे डॉक्टर दाभोलकरांच्या दुर्दैवी खुना नंतर देखील समितीच्या कामांमध्ये अनेक पटीने वाढ झालेली आहे, समितीच्या शाखा वाढलेल्या आहेत, कार्यकर्ते वाढलेले आहेत, हितचिंतक वाढलेले आहेत आणि एकूणच, समितीला पूर्वीसारखाच संपूर्ण समाजामधून उत्तम प्रतिसाद मिळतो आहे आणि म्हणून समाजाच्या भक्कम पाठिंब्यावर समिती अत्यंत आत्मविश्वासाने प्रबोधनाचे काम सातत्याने आणि संयमाने करते आहे. आपल्या आशीर्वादाच्या बळावर याही पुढे ते जोमाने करत राहील याबद्दल आम्ही पूर्ण विश्वास व्यक्त करतो.

'तिमिरातून तेजाकडे'...हा त्यांचा ग्रंथ चळवळीचा दस्तऐवज आहे. दाभोलकर हे विज्ञानवादी समाजसेवक होते.' अशी निष्ठा बाळगणारे दाभोलकर मूर्तिपूट, प्रवाही बोलणारे उत्तम वक्ते होते.समितीचा युएसपी म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र मासिक.

सुरुवातीपासून कोणताही खंड न पडता आजपर्यंत हे मासिक अव्याहत सुरू आहे. या वार्तापत्रावरूनचे वैशिष्ट्य म्हणजे जानेवारी ते ऑक्टोबर असे दहा महिन्याचे दहा अंक आणि नोव्हेंबर डिसेंबर चा वार्षिक जोड अंक दरवर्षी प्रसिद्ध करते.तसेच प्रकाशन विभागातर्फे आतापर्यंत ५० च्या वर ग्रंथ आणि छोट्या पुस्तिका यांचे प्रकाशन अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राने केलेले आहे.संविधान बांधीलकी महोत्सव, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे कार्यक्रम, पर्यावरण पूरक होळी/ रंगपंचमी, वटपौर्णिमा दिनी वृक्षारोपण, महिला प्रबोधन अभियान, नागपंचमी निमित्त सर्प विज्ञान प्रबोधन व पोस्टर प्रदर्शन, बकरी ईद निमित्त रक्तदान मोहीम, २० ऑगस्ट राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन, फटाके मुक्त दीपावली अभियान, ३१ डिसेंबर व्यसनमुक्त नववर्ष साजरे करणे, पर्यावरण पूरक गणेश उत्सव, आकाश दर्शन कार्यक्रम अशा अनेकस्वरूपी विविध कार्यक्रमांची आखणी समितीद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर आपापल्या शाखेत वर्षभरामध्ये आयोजित केली जाते.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एक जन चळवळ आहे. गेल्या ३७ वर्षांमध्ये समितीने हजारो कथित भोंदू बाबा, बुवा, महाराज, मांत्रिक, भगत, देवस्थानं यांचा पर्दाफाश केलेला आहे.समिती दरवर्षी लहान मोठ्या सुमारे १०० भोंदूबुवा-बाबांचा भांडाफोड करते आणि या भोंदू बुवाबाजी विरोधात सातत्याने प्रबोधन व संघर्ष करते. चमत्कारांचे सादरीकरण व त्यामागील विज्ञान समजावून सांगणे याचे प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम सलग ३७ वर्ष सातत्याने समितीने सुरु ठेवलेले आहेत.महाराष्ट्र नरबळी या कायद्याच्या अंतर्गत वर्षांत पोटगुपारा आणि प्रबोधन समितीने केले, तसेच 'जात पंचायतीच्या मनमानीला मूठ माती' या अभियानानंतर महाराष्ट्र शासनाकडून सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा मंजूर करून घेतला.

समितीने फसवे विज्ञान किंवा छद्म विज्ञानाचे दावे करणाऱ्या विरुद्ध प्रबोधन आणि संघर्ष केला. समितीने निरामय मानसिक आरोग्यासाठी 'मानस मित्र' हाप्रकल्प सुरू केलेला आहे.म.ॲनिसचे माजी अध्यक्ष प्राध्यापक एन डी पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'वैज्ञानिक जाणीवा प्रबोधन अभियान' समिती राबवत आहे.याचबरोबर समितीने आतापर्यंत हजारो महिलांचे 'जटा निर्मूलन' करून त्यांची जाचक कलागत मुक्तता केलेली आहे. अशा प्रकारे समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे व समाज विवेकी करण्याचे काम समिती अथक पणे करते आहे.भारतामध्ये विविध जाती-धर्मांचे लोक राहतात, तसेच ईश्वर मानणारे आणि न मानणारे ही लोक राहतात, आणि मुख्य करून भारतीय संविधानाने प्रत्येकाला आपल्या रूढी परंपरा पाळण्याचे अधिकारी स्वातंत्र्य दिलेले आहे आणि याच अधिक्षमी स्वातंत्र्याचा पुरस्कार 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' सातत्याने करत आलेली आहे आणि म्हणूनच कोणत्याही देवाच्या, धर्माच्या विरोधी भूमिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कधीही घेत नाही, यापूर्वी देखील घेतलेली नाही.समितीच्या या भूमिके मुळे डॉक्टर दाभोलकरांच्या दुर्दैवी खुना नंतर देखील समितीच्या कामांमध्ये अनेक पटीने वाढ झालेली आहे, समितीच्या शाखा वाढलेल्या आहेत, कार्यकर्ते वाढलेले आहेत, हितचिंतक वाढलेले आहेत आणि एकूणच, समितीला पूर्वीसारखाच संपूर्ण समाजामधून उत्तम प्रतिसाद मिळतो आहे आणि म्हणून समाजाच्या भक्कम पाठिंब्यावर समिती अत्यंत आत्मविश्वासाने प्रबोधनाचे काम सातत्याने आणि संयमाने करते आहे. आपल्या आशीर्वादाच्या बळावर याही पुढे ते जोमाने करत राहील याबद्दल आम्ही पूर्ण विश्वास व्यक्त करतो.

डॉक्टरांचा हा तेरावा स्मृतिदिन आहे आणि यानिमित्ताने आज समितीतर्फे अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र च्या प्रकाशनाची निर्मिती असलेल्या कोण होते दाभोलकर ?, कोण होते पानसरे ?, कोण होते कलबुर्गी ?, कोणहोत्या गौरी लंकेश ?, तसेच विवेक सातार यांनी लिहिलेले वैज्ञानिक दृष्टिकोन या पुस्तकांचा लोकार्पण समारंभ समितीच्या महाराष्ट्रामधील सर्व शाखांनी आयोजित केलेला आहे. यानिमित्ताने डॉक्टर दाभोलकरांचा विचार आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य घरोघरी पोहोचावे हा उद्देश हेतू आहे.

आम्ही प्रकाश बीजे रुजवित चाललो...वाटा नव्या युगाच्या रुजवीत चाललो... या हेतूने आणि समाज विवेकी व्हावा या एकाच ध्येयाने समिती अखंडपणे, न थकता वाटचाल करीत आहे. आपणही या मार्गावरील पांथस्थ व्हाल.ही अभिप्सा.

बाळ देवधर, शब्दांकन - अनिल वीर

नरेंद्रजी दाभोळकर: मराठी बुद्धिवादी- विज्ञानवादी समाजसुधारक!!

नरेंद्र अच्युतराव दाभोळकर हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अधोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना इ.स. १९८२ साली श्याम मानव यांनी स्थापन केली आहे. मात्र इ.स. १९९८ ९ साली नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाची वेगळी संघटना सुरू केली. ते स्वतः या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. नरेंद्र दाभोलकर यांची मंगळवार दि. २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी साडेसात वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पुलावर अज्ञातांनी चार गोळ्या झाडून हत्या केली, असा उद्घोषक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा शब्दांत जरूर वाचा... संपादक.

नरेंद्रजींचे वडील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व आई ताराबाई यांच्या दहा अपत्यांपैकी नरेंद्र हे सर्वात धाकटे होत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी दि. १ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. सुप्रसिद्ध तत्त्वचिंतक कै. डॉ. देवदत्त दाभोलकर हे त्यांचे सर्वात थोरले बंधू होते. दाभोलकरांनी शौला यांच्याबरोबर विवाह केला. त्यांना मुक्ता आणि हमीद ही दोन अपत्ये आहेत. सामाजिक कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या नावाबरून त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले. लग्न सोहळा व त्या मधील खर्च यावर ते सतत टीका करीत. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह साध्या पद्धतीने केले. नरेंद्र दाभोलकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. इ.स.१९७० साली मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शाखेचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्यांनी सातारा येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

बाबा आढाव यांच्या एक गाव- एक पाणवठा या चळवळीत दाभोलकर यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या इ.स.१९८२ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन सम

उपवर्गीकरण मागणीसाठी महाराष्ट्र राज्यात आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश महामोर्चे सुरू राहतील

माजी नगराध्यक्ष अशोकराव उमरगेकर प्रदेश सरचिटणीस भाजपा, अनुसूचित जाती मोर्चा

पुणे : पिंपरी चिंचवड येथे आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली
उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील मातंग समाजाने उत्तम प्रतिसाद होता.
अनुसूचित जातीतील एससी आरक्षणातील उपवर्गीकरणाची मागणी तातडीने मागणी मान्य करण्यासाठी मातंग व समविचारी जनजाती समूहाच्यावतीने भव्य महामोर्चा काढण्यात आला.
या जनआक्रोश महामोर्चाची सुरुवात चिंचवड स्टेशन येथील क्रांतिगुरु लहुजी साळवे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दु.१२.३० वा. या मोर्चाला सुरुवात झाली. यावेळी ३५ ते ४० हजार समाज बांधव सहभागी झाले होते.

या मोर्चाचे नेतृत्व आमदार अमित
गोरखे यांच्या नेतृत्वाखाली आमदार सुनील कांबळे, माजी मंत्री दिलीपराव कांबळे, माजी गृहमंत्री रमेश बागवे आणि पुणे शहरातील सर्व आजी-माजी नगरसेवक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी या



महामोर्चात सहभागी झाले होते.
प्रतिनिधीशी बोलताना , 'आळंदी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे अशोकराव उमरगेकर म्हणाले,
'महाराष्ट्र शासनाने संविधानाचा आदर करून समता आणि समतेची सर्वांना संधी देण्याचा विचार करावा.'
'महाराष्ट्रातील मातंग समाज हा संविधानाचा आणि राज्यघटनेचा आदर करणारा समाज आहे!'.
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर , आद्यगुरु लहुजी साळवे, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज ,
अण्णाभाऊ साठे या सर्व महामानवांच्या विचारांची जोपासना करणारा मातंग समाज आहे.
महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाची मागणी तातडीने मान्य करावी. अन्यथा महाराष्ट्रातील मातंग समाज आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर जन आंदोलन मोर्चा पर्व सुरू ठेविल. मातंग समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. 'समाजकार्यासाठी आणि देशा कार्यासाठी लढणे. हा मातंग समाजाला नवीन इतिहास नाही'!. असा इशारा महामोर्चाच्या निमित्ताने देण्यात येत आहे.
या महामोर्चात समाजबांधवांची उपस्थितीती लक्षणीय होती . याचा अर्थ महाराष्ट्रातील मातंग समाजाची उपवर्गीकरणासाठी वज्रमूठ झाली आहे.'
या पुढील जन आक्रोश महामोर्चे आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली शिस्तबद्ध निघतील.

कंधार शहरात शुद्ध पाणीपुरवठ्याची मागणी; २४ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा



कंधार/संतोष कांबळे
कंधार शहरातील नागरिकांना नियमित, स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सामान्य नागरिक योगेंद्रसिंह हरिसिंह ठाकूर यांनी कंधार नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.
देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे पूर्ण होत असतानाही कंधार शहरातील नागरिकांना पिण्यासाठी स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळत नसल्याबद्दल निवेदनात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज व हक्क असून, नागरिकांना स्वच्छ पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशुद्ध व अस्वच्छ पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याने नगरपरिषद प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नियमित स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन लवकरात लवकर स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून न दिल्यास २४ ऑगस्ट २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर कुटुंबासह शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन/निषेध करण्यात येईल,असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.
या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आमदार, जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कंधार शहरातील पाणी प्रश्नावर प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



खड्डे बुजवण्यासाठी घंटानाद आरोळी !

....अन्यथा,लोकप्रतिनिधींच्या नावाने चिठ्ठ्या टाकून खड्डे भरणार : संदीप जाधव

सातारा : येथील शहरातील एसटी स्टॅण्ड समोर व परिसरात खड्डेच खड्डे निर्माण झालेले आहेत.तेव्हा लवकरच संबंधितांनी दुरावस्था थांबवावी.अन्यथा, मदार,खासदार,नगराध्यक्ष, उपनगराध्य आदी लोकप्रतिनिधींच्या नावांच्या चिठ्ठी तयार करून खड्डे बुजविण्याचे काम करणार आहे.असे संदीप जाधव (मावळ) यांनी खड्ड्यातच उभे राहून घंटानाद करीत आरोळी दिली आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदासजी आठवले यांची उपनगराध्यक्ष दिवंगत बी एन लोखंडे यांच्या निवासस्थानी सांत्वन पर भेट

परभणी/अरविंद कांबळे
पूर्णा , दिनांक १९ ऑगस्ट २०२६
भारतीय दलित पँथर चे लढवय्ये भीमसैनिक नामांतर चळवळीमध्ये २१ दिवसाचा कारावास भोगलेले मा. उपनगराध्यक्ष दिवंगत बी .एन. लोखंडे यांचे एक ऑगस्ट रोजी
दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.
आपल्या कार्यकर्त्यांवर जिवापाड प्रेम करणारे रामदासजी आठवले आहेत.
पँथर चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सुखदुःखामध्ये अडीअडचणीमध्ये सहभागी होण्याचा त्यांचा स्वभाव
प्रत्येकाला भावतच असतो.
अतिशय व्यस्त वेळापत्रकामधून
त्यांनी लोखंडे कुटुंबाची
सांत्वन पर त्यांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी दोन वाजता भेट घेतली.
आपल्या श्रद्धांजलीपर मनोगतामध्ये ते म्हणाले पँथर बी. एन. लोखंडे हे पूर्ण शहराध्यक्ष होते.
या शहरांमध्ये पँथरची चळवळ
अतिशय जोमात होते.
या ठिकाणाहून पँथर विचाराचे नऊ नगरसेवक निवडून आले होते.
त्यांनी उपनगराध्यक्षपदावर असताना



अनेक समाज हिताची
कामे केली.
दिवंगत बी एन लोखंडे यांच्या पत्नी सावित्रीबाई सुपुत्र संदीप सुनबाई अश्रदा सुकन्या ग्राम पंचायत अधिकारी सरिता लोखंडे दवणे,सुनिता धुळे त्यांचे बंधू यशवंत लोखंडे चंद्रमणी लोखंडे आनंद लोखंडे व समस्त लोखंडे परिवाराची
आत्मीयतेने चौकशी केली
वेळप्रसंगी मदतीचे आश्वासनही दिले.
याप्रसंगी भदंत पयावंश भदंत पयासार महाराष्ट्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष डॉक्टर सिद्धार्थ भालेराव दैनिक रिपब्लिकन गार्डचे संपादक ज्येष्ठ नेते विजय सोनवणे पूर्ण शहर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे एडवोकेट विजय भवरे माजी नगरसेवक अशोकराव धवाले
आदीसह लोखंडे परिवाराचे
आप्तेष्ट नातेवाईक मित्र परिवार
उपस्थित होते.
याप्रसंगी दोन मिनिट स्तब्ध राहून
पूज्य भदंत पयावंश भदंत पयासार यांनी पाली वचनाच्या
गाथा पठण केल्या
अभिवादन कार्यक्रमाचे संचालन
श्रीकांत हिवाळे व शाहीर
गौतम कांबळे व पूजा विधी पार पाडण्यासाठी
बौद्धाचार्य त्र्यंबक कांबळे अमृत कराळे
अतुल गवळी यांनी परिश्रम घेतले.

लोकशाहीर डॉ. वामनदादा कर्डक यांच्या १०४व्या जयंतीनिमित्त लातूरमध्ये भव्य कार्यक्रम



लातूर : लोकशाहीर, लोककवी आणि कवियत्न डॉ. वामनदादा कर्डक यांच्या १०४व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लोककवी कवियत्न डॉ. वामनदादा कर्डक जयंती उत्सव समिती, २०२६ यांच्या वतीने लातूर शहरातील बौद्ध समाजातील नूतन महापौर, नगरसेवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी बुद्ध आणि भीम गीतांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, डॉ. वामनदादा कर्डक यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि प्रबोधनात्मक कार्याला अभिवादन करण्यात येणार आहे.
हा कार्यक्रम रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बुद्ध गार्डन, लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष धम्मदीप सपकाळ, उपाध्यक्ष सुधीर कावळे, सचिव आकाश जगताप आणि कोषाध्यक्ष अतुल गायकवाड यांच्यासह समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.
तरी लातूरकर नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी आणि भीम अनुयायांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.
बिनीत :
लोककवी कवियत्न डॉ. वामनदादा कर्डक जयंती उत्सव समिती, २०२६

माझ्या राजकीय आणि सामाजिक कार्याचे प्रेरणास्थान, भारतरत्न,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत ..! खासदार,प्राध्यापक डॉक्टर ज्योतीताई वाघमारे

परभणी/अरविंद कांबळे
बुद्ध विहार,पूर्णा या ठिकानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष भदंत,डॉ,उपगुप्त महाथेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व भदंत पयावंश,भंते पयासार यांच्या संयोजनाखाली दि.१७ ऑगस्ट २०२६ रोजी,दुपारी-२ वाजता करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नगरसेविका रेखाताई खर्गखराटे ह्या होत्या.प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष विशाल कदम यांची उपस्थिती होती.
या वेळी बोधिसत्व. डॉ.बी. आर.आंबेडकर स्मारक व बुद्ध विहार समितीच्यावतीने
शाल,पुष्पहार,साडी,स्मरणिका,स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.आपल्या प्रमुख संबोधनामध्ये त्यांनी सांगितले.अगदी बाल्यवयापासून शालेय जीवनापासून मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्शस्थानी होते.माझे वडील पँथर चळवळीतील,आंबेडकरी चळवळीतील निष्ठावान अनुयायी होते.सोलापूर येथील एका शाखेचे शाखा अध्यक्ष होते.१९९० भारतरत्न,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मशताब्दी त्यानिमित्ताने मला गुरुजींनी लिहून दिलेले भाषण मी राजभर पाठ केले
व दुसऱ्या दिवशी शाळे मध्ये कार्यक्रमामध्ये सादर केले.
माझ्या आवेशपूर्ण भाषणावर कौतुकाचा वर्षाव झाला.
त्या मुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे माझे प्रेरणास्थान व ऊर्जास्थान आहेत.
मी स्वतःला भीम कन्या समजते.
पूज्य भदंत डॉ उपगुप्त महाथेरो
यांच्या प्रमुख मार्गदर्शनातून
माझ्या सत्कार समारंभाचे अतिशय भव्य दिव्य प्रमाणात केले.
बुद्ध गया येथील महा बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात मिळावे यांसाठी खासदार या नात्याने भरीव प्रयत्न करणार आहे.येथील बुद्ध विहाराच्या



विकासकामांसाठी मदत करणार आहे .ते माझं मी कर्तव्य समजते .आपल्या प्रास्ताविक मनोगतात डॉ. उपगुप्त महाथेरो सत्कार आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली.
व विहारात राबविल्या जाणाऱ्या विविध लोकोपयोगी उपक्रमाची माहिती दिली.स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या साठी सुसज्ज अभ्यासिका
विविध दुर्मिळ संदर्भ ग्रंथ भदंत उपालीथेरो वाचनालय ग्रंथालय यामधून अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी शासकीय सेवेत अधिकारी कर्मचारी म्हणून लागले आहेत.एक आदर्श संस्कार केंद्र म्हणून या विहाराकडे बघितल्या जाते .
या वेळी प्रमुख अतिथी विशाल कदम यांचे समयोचित मनोगत झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा जेस्ट नगरसेविका रेखाताई खर्गखराते आपल्या अध्यक्षीय समारोपात खासदार प्रा. डॉ.ज्योतिताई वाघमारे यांच्या संसदेतील अभ्यासपूर्ण भाषणाची खासदार पदाची शपथ घेत असताना त्यांनी केलेल्या वेशभूषेची आठवण करून दिली .आम्हा सर्व महिला भगिनींना आदरणीय ज्योतीताई यांचा सार्थ अभिमान आहे.
कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मुकुंद भोळे नगरसेवक प्रकाश कांबळे,उत्तम खंदारेजिल्हापरिषद संदस्य संदीप ढगे नगरसेविका,जनाबाई जोंधळे अर्चना कांबळे वंदना रणवीर पद्मीनबाई येंगडे राजनंदिनी पंडित गौतम भोळे रौफ कुरेशी अमजद नूरी, दिलीप गायकवाड विजय बगा टे,श्रीकांत हिवाळे टी.झेड.कांबळे
अमृतराव मोरे गंगाधर कांबळे रामकिशन साळवे आदीसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाहीर विजय सातोरे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी
रामू भालेराव बाळू बरबडीकर अरविंद पवार राजू जोंधळे सोनू काळे
त्याच प्रमाणे बोधिसत्व डॉ. बी. आर.आंबेडकर स्मारक व बुद्ध विहार समिती भारतीय बौद्ध महासभा व धम्म सेवेत असलेल्या महिला मंडळानी केले .

नगरपरिषदेच्या शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना रायटिंग पॅड

नगराध्यक्षा ऐश्वर्याताई अभिजीत पाचर्णे यांच्या पुढाकारातून उपक्रम; शिरूर-हवेलीचे लोकप्रिय आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊलीआबा कटके यांच्या हस्ते वितरण...

प्रतिनिधी / अविनाश घोगरे
शिरूर : भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शिरूर नगरपरिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नगराध्यक्षा ऐश्वर्याताई अभिजीत पाचर्णे यांच्या पुढाकारातून स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊलीआबा कटके यांच्या हस्ते नगरपरिषदेच्या शाळांमधील तब्बल एक हजारकरण्यात आले विद्यार्थ्यांना रायटिंग पॅडचे वाटप करण्यात आले.



स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार माऊलीआबा कटके यांच्या हस्ते रायटिंग पॅडआहे वितरणाचा शुभारंभ झाला. त्यानंतर नगरपरिषदेच्या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना रायटिंग पॅडचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना दैनंदिन अभ्यासासाठीआहे आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, शिक्षणाबद्दल त्यांच्यात उत्साह निर्माण व्हावा आणि शैक्षणिक वातचालीला बळ मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यांचा आला. रायटिंग पॅड हातात मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष गरजांचा विचार करून उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्यानेनाने पालक, शिक्षक आणि उपस्थित नागरिकांकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.
विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य नगराध्यक्षा ऐश्वर्याताई अभिजीत पाचर्णे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नगरपरिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन अभ्यासासाठी उपयुक्त साधआहे उपलब्ध झाले आहे. आर्थिकदृष्ट्या सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्याआहे मिळावे आणि त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यावर भर दिला जात असल्याचे यावेळी

विद्यार्थ्यांच्या गरजांना प्राधान्य देणारे नेतृत्व आहे नगराध्यक्षा ऐश्वर्याताई अभिजीत पाचर्णे

शिरूर नगरपरिषदेच्या शाळांमध्ये शिमाती घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन रायटिंग पॅड वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणाची संधी नव्हे, तर त्यासाठी आवश्यक साधनेही उपलब्ध झाली पाहिजेत, या भूमिकेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने एक हजार विद्यार्थ्यांच्या हातात शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक उपक्रमांना प्राधान्यआहे दिले जाईल.
सांगण्यते आले. शिक्षणासाठी आवश्यक साधन-सुविधा उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे ही राष्ट्रनिर्मितीची महत्त्वाची पायाभरणी आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा हातात शैक्षणिक साहित्य देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक संदेश देण्यात आला.

एक हजार विद्यार्थ्यांना लाभ
नगरपरिषदेच्या विविधाची शाळांमधील एकूण एक हजार विद्यार्थ्यांना रायटिंग पॅडचे वाटप करण्यात आले. शालेय अभ्यास, लेखन आणि दैनंदिन शैक्षणिक कामासाठी उपयुक्त साहित्य मिळाल्याने विद्यार्थी व

शैक्षणिक उपक्रमांना सहकार्याचीही भूमिका

माजी सभापती, सार्वजनिक बांधकाम समिती तथा नगरसेवक अभिजीत गणेश पाचर्णे नगरपरिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल, अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.
शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. स्वातंत्र्य दिनाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देणारा ठरला.
मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमास नगराध्यक्षा ऐश्वर्याताई अभिजीत पाचर्णे, पंचायत समितीच्या सभापती स्वातीताई विठ्ठल घावटे , उपनगराध्यक्ष मितेश गादिया, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापतीका तथा नगरसेवक सुनीलदादा जाधव, स्वच्छता समितीचे सभापती तथा नगरसेवक एजाजभाई बागवान, नगरसेवक अभिजीताकाका पाचर्णे, निलेश गाडेकर,आहे नगरसेवक सागर नरवडे, नगरसेविका संगीता मल्लाव, चारुशिला कोळपकर, राष्ट्रवादी कॉग्रेस शिरूर शहर अध्यक्ष शरद कालेवार यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, शिक्षक व प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

निसर्ग शाळा बांध शेती उपक्रमातून कृषी दुतांनीबांधशेती सामाजिक संदेश



भारत हा कृषिप्रधान देश आहे अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा कणा म्हणून शेतीकडे पाहिली जाते या शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय शेतीचा संज्ञशी अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ सांगुळवाडी महाविद्यालयाचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक सलंगन अतर्गतजिप पुप्राथशाळा वारगाव क्र २,३ येथील विद्यार्थांना मार्गदर्शन तसेच विद्यार्थांना कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण देतानादेश देत हवामान बदल नैसर्गिक संकट पाण्याचा योग्य वापर शेतीच्या उत्पादना मधून आर्थिक उलाढाल विद्यार्थ्यांच्या मध्ये शेती विषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी वारगाव ग्रामपंचायत व कृषी दुतांनी बांधावरची शेती अनोखा उपक्रम घेत निसर्ग शाळा संकल्पना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारगाव सिंधुदुर्ग तालुका कणकवली शाळा क्रमांक दोन तीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत वारगाव,सरपंच-नाना शेटये मुख्याध्यापकमुख्याधापक - अर्चना तळगावकर शिक्षिका- पूजा कडकोळ -शिवानी देसाई -मंगेश खांबलकर मुख्याध्यापक- समिधा शेटये शिक्षक- रेखा लंगे गायत्री खोत कृषिदूत प्रणव जाधव , राजवर्धन पवार हर्षवर्धन पाटील ,स्वप्निल जाधव प्रज्वल साळुंखे,सिदेश सावंत,रवी घोडसे,यश घोडसे

गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास आणि प्रलंबित प्रश्नांबाबत धोरण निश्चित करणार - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई, दि. १९ – राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्न आणि महसूल विभागाशी संबंधित सवलतींची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भातील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय केळकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत गृहनिर्माण संस्थांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर चर्चा होऊन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

स्वयंपुनर्विकासातील अडथळे दूर होणार



सध्या अनेक संस्था एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) मध्ये समाविष्ट नसल्याने त्यांच्या स्वयंपुनर्विकासात अडचणी येत आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी २०१९ च्या शासन निर्णयानुसार इतर करांमध्ये सवलत देण्याचे आणि १० टक्के प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) देण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, स्वयंपुनर्विकासासाठी 'बर्क कॉन्ट्रॅक्ट' आणि 'डेव्हलपमेंट ?ग्रीमेंट' बाबतचा सुटसुटीत मसुदा तयार करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वित्त विभागाकडून चार टक्के सवलत मिळण्यासाठी गृहनिर्माण विभागाने त्वरित प्रस्ताव सादर करावा आणि नोंदणी महानिरीक्षकांकडून याबाबत स्पष्टता घ्यावी, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले.

डीम्ड कन्व्हेअन्स प्रक्रियेला गती आणि सुलभता

राज्यात सध्या सुमारे एक लाख १५ हजार नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था असून, त्यापैकी तब्बल ६० ते ७० हजार संस्थांचे अद्याप 'डीम्ड कन्व्हेअन्स' झालेले नाही. सहकार, महसूल, जमाबंदी आणि नोंदणी महानिरीक्षक विभागांच्या समन्वयाने ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांच्या मालमत्ता पत्रकावर(प्रॉपर्टीकार्ड) किंवा सातबारा उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये आता गृहनिर्माण संस्थांच्या नावाची नोंद करण्यात यावी, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या.

म्हाडामधील सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी

शासनाने अकृषिक कर यापूर्वीच रद्द केला आहे. तरीही काही ठिकाणी तो वसूल केला जात असल्याच्या बाबीकडे लक्ष वेधण्यात आले. यासोबतच इमारतीमधील नागरी कमाल जमीन धारणा (युएलसी) आरक्षित असलेल्या सदनिकांबाबत योग्य कार्यपद्धती निश्चित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून राबविण्यात येणाऱ्या या प्रक्रियेत मतदान केंद्रांचे सुसुत्रीकरण आणि प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासंबंधीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या उद्देशाने वेळापत्रकात ही सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रारूप मतदार यादीसंदर्भात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येऊ शकतील.

'अभ्यास आणि मेहनत करा पोलिस विभागातील नोकरीच्या संधी मिळवा - पी.एस.आय.दिशा गवळी'



कोराडी / दिलीप येवले

तायवाडे महाविद्यालय, महादुला-कोराडी येथील करिअर कट्टा,राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आणि फिनिक्स करिअर अकॅडमी कोराडी यांच्या संयुक्त विद्यमाने तायवाडे महाविद्यालयातील श्री. पंजाबराव देशमुख सभागृह येथे 'पोलिस भरती आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षम्हणून इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. वर्षा वैद्य तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ. दिशा गवळी पी.एस.आय. कोराडी पोलीस स्टेशन, कोराडी आणि विशेष अतिथी म्हणून श्री प्रदीप कमाले, संचालक फिनिक्स करिअर अकॅडमी कोराडी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. वकील शेख हे मंचावर उपस्थित होते.

सौ.दिशा गवळी यांनी आपल्या यशस्वी वाटचालीमध्ये कशा प्रकारे मेहनत, डावपेच आणि तंत्र, नियोजनबद्ध कार्याचा भाग केला, त्याचबरोबर सध्याच्या काळातील सोशल मीडियामुळे मुलं आणि मुली यांच्या समोर कशाप्रकारे अनेक समस्या निर्माण होत आहे आणि या समस्या बाजूला ठेवून आपले भविष्य बनविण्यासाठी मुलांनी अभ्यासावर फोकस करणे कसे गरजेचे आहे हे आपल्या व्याख्यानातून सांगितले. फिनिक्स करिअर अकॅडमी चे संचालक, कॉलेजचे माजी विद्यार्थी श्री. प्रदीप कमाले यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीतून आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रथवीतची वाटचाल कशी झाली ती थोडक्यामध्ये विद्यार्थ्यांना समजून सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. वर्षा वैद्य यांनी सध्याच्या ए. आय.आणि चॅट जी. पी. टी. च्या काळात कौशल्य विकास किती महत्त्वाचे आहे तरच आपल्याला रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अन्यथा आपण प्रवाहाच्या बाहेर फेकले जाऊ अशा प्रकारचे मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. वकील शेख यांनी आपल्या प्रस्तावनेमध्ये कार्यक्रमाची रूपरेषा आणि प्रमुख अतिथी आणि वक्त्याचे परिचय करून दिले. समारोप डॉ.विष्णू चव्हाण यांनी केले. याप्रसंगी फिनिक्स अकॅडमी तसेच तायवाडे महाविद्यालयातील तीनही विद्यार्थ्यांचे मोठ्या विद्यार्थ्यी उपस्थित होते.

शहीद हरिभाऊ लाखे यांच्या स्मारकाला लाभली पुतळ्याची मानवंदना



ग्रे प्रोडक्शन नागपूरच्या कलाकारांचा पुढाकार; १५ ऑगस्टला केळझर येथे सत्कार

सेलू/ प्रशांत झाडे

केळझर येथील रहिवासी असलेले आपल्या प्राणांची आहुती देणारे शहीद हरिभाऊ लाखे यांच्या स्मृतीला चिरंतन उजाळा मिळावा, या भावनेतून त्यांच्या स्मारकावर पुतळा उभारण्याचा संकल्प साकारण्यात आला आहे. रोशन इंगोले यांच्या संकल्पनेतून आणि ग्रे प्रोडक्शन, नागपूर येथील कलाकारांच्या अथक परिश्रमातून शहीद हरिभाऊ लाखे यांचा सुमारे चार फूट उंचीचा आकर्षक बस्ट साईज पुतळा तयार करण्यात आला आहे.शहीद हरिभाऊ लाखे यांना स्मारकस्थळी मानवंदना देण्यासाठी पुतळा असावा, अशी संकल्पना रोशन इंगोले यांच्या मनात अनेक दिवसांपासून होती. त्यासाठी त्यांनी गेल्या काही महिन्यांपासून लाखे यांच्या कुटुंबीय तसेच मित्रपरिवाराशी संपर्क साधून त्यांचे जुने छायाचित्र व ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असलेली चित्रे संकलित केली. याछायाचित्रांच्या आधारे प्रथम मातीमध्ये त्रिमितीय (थ्रीडी) मॉडेल तयार करण्यात आले. हे मॉडेल कुटुंबीय व मित्रांना दाखवून त्यांच्या सूचनांनुसार आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर पुतळ्याची पुढील प्रक्रिया पूर्ण करून १५ ऑगस्ट रोजी केळझर येथील शहीद स्मारकस्थळी या पुतळ्याच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या कलाकारांचा ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी तसेच गावातील नागरिकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शहीद हरिभाऊ लाखे यांच्या स्मृतीला कलात्मक रूपातून दिलेली ही मानवंदना गावकऱ्यांसाठी अभिमानाचा क्षण ठरला.

त्याला कॉपर कलरिंग देण्यात आले.या पुतळ्याच्या निर्मितीत ग्रे प्रोडक्शन, नागपूरच्या कलाकारांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. रोशन इंगोले (केळझर), तुषार प्रधान (यवतमाळ), श्रीपाद भोंगाडे (हिंगणघाट), कृष्णा सालवडकर (नागपूर) यांच्यासह नीताई मुजुमदार, विश्वजीत दादा (मूर्तिकार), मयूर सोनटक्के, निखिल नरताम, सुधांशू सोनटक्के, वैभव ईरटकर, मयूर कोथळे, आदित्य इंगोले (केळझर), उर्वशी डेकाटे (वर्धा), देवांशू अहुजा, करण बजाज (यवतमाळ), कुणाल बावणे (नागपूर), हर्षल आदी कलाकारांनी पुतळा साकारण्यासाठी योगदान दिले.

'चित्रकला परीक्षेत केळझरच्या जिगनेस हिवराये'ने पटकविला प्रथम क्रमांक

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश; स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव

सेलू / प्रशांत झाडे

केळझर येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित चित्रकला परीक्षेत केंद्रातून सहभागी झालेल्या १० विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता तिसरीतील विद्यार्थी जिगनेस विनोद हिवराये याने प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळविले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमानिमित्त मान्यवरांच्या हस्ते जिगनेस हिवराये याचा चित्रकला परीक्षेतील यशावद्दल प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. लहान वयात चित्रकलेच्या क्षेत्रात मिळविलेल्या या यशावद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



याप्रसंगी मंचावर माजी सरपंच तथा प्रशासक अर्चना लोनकर, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद लाखे, डॉ. नरेश सोमनाथे, पोलीस पाटील प्रकाश खंडाळे, पत्रकार भारत घवघवे व सुधाकर बोरघरे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाला केंद्रप्रमुख योगेश्वर खेवले, मुख्याध्यापिका स्नेहा तमगिरे, सहायक शिक्षक मंगेश घुमडे, सहायक शिक्षिका योगिता दादाराव युवनाथे, सहायक शिक्षिका मनिषा मधुकर नारखेडे, सहायक शिक्षक अजय मोरे तसेच विशेष शिक्षक कमल विजय खरे उपस्थित होते.जिगनेसच्या या यशावद्दल शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रामराव साबळे पब्लिक स्कूल येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



खापरखेडा/ दिलीप येवले

खापरखेडा येथील कौडण्यबहुउद्देशीय शिक्षण संस्था द्वारा संचलित रामराव साबळे पब्लिक स्कूल खापरखेडा येथे वृक्षारोपण कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेला होता. माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मच्छिंद्र सावळे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जयश्री सावळे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक मोहनलाल रंगारी यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकांमध्ये वृक्षारोपणाचे महत्त्व सांगून जीवनात वृक्षाचे महत्त्व कसे आहे व प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या घरी एक तरी झाड लावावे असे प्रास्तावितकात मुख्याध्यापक यांनी मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मच्छिंद्र सावळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्ष हे मानवाला मिळालेली मौल्यवान नैसर्गिक भेट आहे. झाडे लावून ते जगविने व त्याची निगा राखणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे आपला परिसर हा हिरवागार ठेवावा पाहिजे असे मत अध्यक्ष मच्छिंद्र सावळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जयश्री सावळे यांनी वृक्षाचे आपल्या जीवनात काय महत्त्वाचे स्थान आहे वृक्ष जगवून निसर्गाची सानिध्यात आपला वेळ घालावा.व जीवनाचा आनंद घ्यावा असे मत व्यक्त केले. सर्व मान्यवरांचा हस्ते अंतर्गत शालेय प्राणगामध्ये वृक्षारोपण करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका डॉ. पल्लवी कोल्हे यांनी केले तर आभार प्रदर्शनशिक्षिका सलमान खान यांनी मानले या कार्यक्रमाला शिक्षिका वैशाली बघमारे सरिता दिवे, बावणे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० वर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

मुंबई : अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केले आहे.

महाडीबीटी २.० प्रणालीवर भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप), राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध सुविधांसाठी अर्ज करता येणार आहेत.

शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार असल्याने अर्ज भरताना आधार क्रमांकासह मोबाईल क्रमांक, ई-मेल व बँक खात्याची अचूक माहिती नोंदविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी २.० प्रणालीवर नवीन नोंदणी करून ऍप्लिकेशन तयार करावी. यासाठी पूर्वीच्या महाडीबीटी पोर्टलवरील युजर आयडी व पासवर्डची आवश्यकता राहणार नाही.

नवीन तसेच नूतनीकरण अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे आदी आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन सादर करावीत. अर्ज सबमिट करण्यापूर्वी नोंदविलेली माहिती काळजीपूर्वक तपासून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त अर्जांची छाननी व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाइन सादर करावेत. विद्यार्थ्यांकडून अर्जाच्या प्रक्रियेसाठी अनावश्यक शुल्क आकारू नये, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

महाडीबीटी २.० पोर्टलवर अर्ज भरताना तांत्रिक अडचण उद्भवल्यास ०२२-४९१५०८००/१८००१०२५३४४ अथवा पत्ज्ञेर्ड्डू.द.ग्र या हेल्पडेस्कशी संपर्क साधावा .तसेच शिष्यवृत्तीचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना वेळेत मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनीच संबंधित महाविद्यालयांनी विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात सहायक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर यांनी यांनी केले आहे.

रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी बोलता न आल्यास बॅज निलंबित केला जाणार – मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी उद्या, २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना प्रथम एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज व परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्यावतीने गेल्या १०५ दिवसांपासून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' राबविण्यात आले. या अभियानाला सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी प्रतिसाद देत मराठीचे प्रशिक्षण घेतले. ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत सहभागी चालकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. या सर्व चालकांचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी अभिनंदन केले.

राज्यात १९८९ पासून असलेल्या नियमाच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार आता या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. महाराष्ट्रात देशाच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांना रोजगार मिळावा, ही शासनाची भूमिका आहे. मुंबईने नेहमीच देशभरातील नागरिकांना सामावून घेतले आहे. मात्र, महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीचा अभिमान राखणेही तितकेच आवश्यक आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, मराठी शिकणार नाही, बोलणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेणाऱ्या चालकांविरोधात कायद्याच्या चौकटीत कारवाई करणे हे परिवहन विभागाचे कर्तव्य आहे. अशा चालकांना आता कोणतीही अतिरिक्त मानवतावादी मुदत न देता कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.



नवीन बॅज देताना मराठी ज्ञानाची व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारे तपासणी

राज्यात आतापर्यंत सुमारे ९ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी परवाने व बॅज देण्यात आले आहेत. यापुढे नवीन परवाना व बॅज देताना चालकाला व्यावहारिक मराठीचे ज्ञान आहे की नाही, याची आरटीओ अधिकारी प्रत्यक्ष संवादाद्वारे तपासणी करेल आणि त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच बॅज देण्यात येणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

बनावट अधिवास प्रमाणपत्रांचीही तपासणी

रिक्षा-टॅक्सी परवाना किंवा बॅज मिळविण्यासाठी बनावट अधिवास प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रमाणपत्रांची सखोल तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित व्यक्ती खरोखर महाराष्ट्रात १५ वर्षांपासून वास्तव्यास आहे का, याची आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष पडताळणी तसेच पोलिसांच्या माध्यमातून चौकशी करूनच पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश आरटीओ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

या संपूर्ण मोहिमेची जबाबदारी अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आली असून, पुढील महिन्याच्या अखेरीस या मोहिमेचा अहवाल सादर करण्यात येणार असल्याची परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी महामंडळाच्या माध्यमातून ५७ कोटींची तरतूद

रिक्षा-टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या आनंद दिघे यांच्या नावाच्या महामंडळाचे सुमारे ३७ हजारांहून अधिक सदस्य झाले आहेत. या महामंडळामार्फत विविध कल्याणकारी योजनांसाठी सुमारे ५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठीच्या योजना, रिक्षा चालक वयाच्या ६५ वर्षानंतर मिळणारे १० हजार रुपयांचे अनुदान, गंभीर आजार अथवा उपचारांसाठी आर्थिक मदत यासह विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

बांधशेती उपक्रमातून निसर्ग शाळा कृषी दूतांनी आरोग्य शेतीचा अनोखा संदेश.....?



भारत हा कृषिप्रधान देश आहे अर्थव्यवस्थेचा सर्वात मोठा कणा म्हणून शेतीकडे पाहिली जाते या शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय शेतीचा संऊश्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ सांगुळवाडी महाविद्यालयाचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्न अंतर्गत जि प पू प्राथ शाळा वारगाव क्र २,३ येथील विद्यार्थींना मार्गदर्शन तसेच विद्यार्थींना कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण देतानादेश देत हवामान बदल नैसर्गिक संकट पाण्याचा योग्य वापर शेतीच्या उत्पादना मधून आर्थिक उलाढाल विद्यार्थ्यांच्या मध्ये शेती विषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी वारगाव ग्रामपंचायत व कृषी दुतांनी बांधावरची शेती अनोखा उपक्रम घेत निसर्ग शाळा संकल्पना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारगाव सिंधुदुर्ग तालुका कणकवली शाळा क्रमांक दोन तीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिले या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत वारगाव, सरपंच- नाना शेटये मुख्याध्यापकमुख्याधापक - अर्चना तळगावकर शिक्षिका- पूजा कडकोळ -शिवानी देसाई -मंगेश खांबलेकर मुख्याध्यापक- समिधा शेटये शिक्षक- रेखा लंगे गायत्री खोत कृषिदूत प्रणव जाधव राजवर्धन पवार हर्षवर्धन पाटील स्वप्निल जाधव प्रज्वल साळूंखे सिदेश सावंत रवी घोडसे यश घोडसे

गंगापूरच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला गती द्या कालबद्ध पद्धतीने योजना पूर्ण करा – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

प्रशासकीय तसेच तांत्रिक त्रुटींची पूर्तता संबंधित विभागांनी निश्चित कालमर्यादेत करावी.



मुंबई : गंगापूर शहराची वाढती लोकसंख्या आणि शहरालगतच्या नव्याने समाविष्ट झालेल्या परिसराची गरज लक्षात घेता गंगापूर नगरपरिषदेच्या नवीन पाणीपुरवठा योजनेला तातडीने गती देण्यासाठी कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

गंगापूर नगरपरिषदेच्या नवीन पाणीपुरवठा योजनेसंदर्भात आढावा बैठक आज सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी आमदार सतीश चव्हाण, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त संजय काकडे, गंगापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संजय जाधव, उपाध्यक्ष अमोल जगताप, पाणीपुरवठा सभापती सोपान देशमुख, नगरसेवक संतोष आंबीलवाडे, मुख्याधिकारी संतोष आगळे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, गंगापूर शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. शहराची लोकसंख्या जवळपास ५० हजारांपर्यंत पोहोचली आहे. तसेच आंबेवाडी आणि शहर परिसरातील इतर भागांचा समावेश झाल्याने सध्याची पाणीपुरवठा व्यवस्था अपुरी पडत आहे. त्यामुळे नागरिकांना पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन योजनेची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे. योजनेच्या मार्गातील प्रशासकीय तसेच तांत्रिक त्रुटींची पूर्तता संबंधित विभागांनी निश्चित कालमर्यादेत करावी. आवश्यक त्या सर्व परवानग्या घेऊन योजनेचे काम वॉर फुटिंगवर हाती घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. गंगापूर शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याची गरज लक्षात घेऊन योजनेचे नियोजन व अंमलबजावणी दर्जेदार पद्धतीने करावी आणि कामाच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्या.

माहेर शांतीनिवास चे वतीने श्रावण महोत्सव साजरा



सेलू / प्रशांत झाडे

माहेर शांती निवास वृद्धाश्रम सेलू घोराड चे वतीने श्रावण महोत्सव २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात आनंदात साजरा करण्यात आला या कार्यक्रमास . सिस्टर लुसी कुरियन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या संचालिका व संस्थापिका माहेर संस्था , शितलताई पंकज भोयर प्रियदर्शनी महिला विकास संस्था अध्यक्ष, गीतांजली गारगोटे पोलिस उपनिरीक्षक वर्धा शहर, .योगिता संजय इंगळे, सुषमा संजय मानमोडे , सुवर्णा संजय धोंगडे ,कविता अमर गुंदि उपसरपंच जुवाडी यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमांमध्ये महिलांसाठी पारंपारिक खेळ विविध वेशभूषा उखाणे स्पर्धा व पर्यावरण विषयक उपक्रम राबविण्यात आला यात सहभागी सर्वांना बक्षिस देण्यात आली यात २०० फुले व फळे यांचे वृक्ष वाटप करण्यात आले व ते घरी जोपासावे असे महिलांना सांगण्यात आले कार्यक्रमांमध्ये प्रमुख आकर्षण साई भजन मंडळ हिंद नगर व घोराड येतील ५५ ते ७० वयोगटातील आजींनी विविध गाण्यावर नृत्य करून सर्वांचे मन जिंकले करेला वय नसते हे त्यांनी त्यांच्या नृत्यातून सर्वांना दाखवून दिले त्याचबरोबर प्रजापिता ब्रह्मकुमारी सेलू येथील वैष्णवी दिदींनी सर्वांना व्यसनमुक्ती यावर शपथ दिली नवज्योती व त्रिमूर्ती ग्राम संघसेलू व कलावधीने परफॉर्मिंग आर्ट अकॅडमी वर्धा डॉक्टर चंद्रकांत सहारे यांच्या युपने व लीना सोरते यांच्या युप ने सुद्धा सर्वांचे मन जिंकली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नलिनी फाजरे यांनी तर माया शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले या कार्यक्रमासाठी माहेर संस्थेतील कर्मचारी प्रकल्प प्रमुख अतुल शेळके रेश्मा आदमने प्रियंका कावे दिपाली भलावी अर्चना दुरबडे तुकाराम ढोकले प्रमोद काटवे साहिल दुधबडे सुरज ढोले यांनी मोलाचे सहकार्य केले

पुलगाव पोलिसांची मोठी कारवाई; शीतला माता मंदिर परिसरात रेड, ६.५६ ग्रॅम ब्राऊन शुगरसह २ जणांना अटक



पुलगाव : मुखबीराच्या माहितीवरून पुलगाव पोलिसांनी शीतला माता मंदिर परिसरात धाड टाकून २ आरोपींकडून ६.५६ ग्रॅम ब्राऊन शुगर म्हणजेच हेरॉईन जप्त केले. याप्रकरणी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

पोलीस उपनिरीक्षक शहाजी घोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे.

गुन्ह्याचा तपशील

गु.र.क्र. ६८३/२०२६ कलम ८(क), २१(ब), २९ एन.डी.पी.एस. अ‍ॅक्ट

घटनास्थळ शीतला माता मंदिर परिसर, पुलगाव ता. देवळी

घटना वेळ:दिनांक १६/०८/२०२६ रोजी सायं. १६.४० वा. ते १७.५० वा. दरम्यान

गुन्हा दाखल: दिनांक १८/०८/२०२६ रोजी रात्री २१.१७ वा.अटक आरोपी:१. प्रथम धनराज चटपकर वय २३ वर्षे, रा. इंदिरानगर, पुलगाव, ता. देवळी जि. वर्धाजावेद अहमद मुख्तार अहमदङ वय ४३ वर्षे, रा. गुंजखेडा, ता. देवळी, जि. वर्धा,जप्त माल:१. निव्वळ ६.५६ ग्रॅम ब्राऊन शुगर(हेरॉईन) किंमत ३७,२०० रुपये, २. आरोपी क्र. ०१ चा मोरपंखी ऑप्पो कंपनीचा मोबाईल किंमत १०,००० रुपये, ३. आरोपीक्र. ०२ चा फिकट गुलाबी ऑप्पो कंपनीचा मोबाईल किंमत १५,००० रुपये, एकूण जप्त मुद्देमाल: ५७,२०० रुपये.अशी होती कारवाई:

मुखबीराकडून मिळालेल्या माहितीवरून पंच व पोलीस स्टाफसह एनडीपीएस कायद्यानुसार कायदेशीर रेड कार्यवाही करण्यात आली. या कारवाईत दोन्ही आरोपींकडून वरील मुद्देमाल जप्त करून घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. या अधिका-यांचे सहकार्य: सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक श्री. सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक श्री. सदाशिव ढाकणे यांच्या निर्देशप्रमाने झाली.

कारवाईत सहा. पोलीस निरीक्षक नितीन मदनकर, पोउपनि शहाजी घोडके, पोअं विनोद रघाटाटे, कुणाल हिवसे, संदीप बोरवन, अजय अर्नतवार, सोमेश गंधाडे, संदीप चरि, अमोल आडे, नकुल शेंडे यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक नितीन मदनकर करीत आहेत.

रमेश निमसडकर राजश्री शाहू महाराज पुरस्काराने सन्मानित

समाजासाठी केलेले कार्य हीच खरी मानवसेवा : - इमरान राहा



वर्धा :- समाजात नेहमीच बदल घडून येतात. मात्र सामाजिक बदलांसाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. जे स्वतःच्या कुटुंबापलिकडे जाऊन समाजाचा विचार करतात त्यांना खरी मुक्ती मिळते आणि या सेवेला मानव सेवा म्हणतात असे मत साहित्यकार इमरान राही यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सिंदी मेघे परिसरातील समाज मंदिरामध्ये अश्वघोष सांस्कृतिक कला मंचातर्फे ऑल इंडिया समता सैनिक दलाचे विदर्भ सचिव सुप्रसिध्द समाजसेवी रमेश निमसडकर यांना सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राजश्री शाहू महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . हा पुरस्कार शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, प्रदेश कार्याकारीणी सदस्य राजुलभाणे, कवि प्रकाश जिंदे, संजय मोडक, यशदा अकादमीचे संचालक एडवोकेट निखिल बुरबुरे, समाजसेविका स्मीता चौव्हान, समाजसेवी राजु वाघमारे, आंबेडकरी साहित्यिक रचना नगराळे, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी सदस्य आरती निमसडकर, आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्षेत्र कोणताही असो अविरतपणे व प्रमाणिकपणे कार्य केले तर निर्मळ यश पदरी पडल्याशिवाय राहत नाही आजपर्यंत मला अनेक पुरस्कार मिळाले परंतु मला मिळालेले राजश्री शाहू महाराज पुरस्कार माझ्या जीवनात आनंदाचा क्षण आहे अशी भावना रमेश निमसडकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन संजय मोडक यांनी तर आभार चैतन्य चव्हान यांनी मानले. कार्यक्रमात परिसरातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा उपाध्यक्ष सरिता कुसळे ,डॉ.माधवी पाटील, प्रणिता खैरकर, प्राचार्य अनिल खडतकर, प्राचार्य विनोद जवादे, समाजसेवी सुनील बाभळे, आशिष रत्नमाला नरेश लोखंडे, जीवनप्रकाश निमसडकर, मिलिंद मून, तालुकाध्यक्ष प्रीतीताई कांबळे, कविता पाटील, लीना पाटील, प्रतिभा कांबळे, दिलीप वैद्य, धर्मपाल गोटे ,चरण गायकवाड, ऋषी सोनारकर, धीरज मुंजेवार, भारती नगराळे यांनी अभिनंदन केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

१९ कोटी रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे या उपक्रमांतर्गत मोफत शालेय दप्तर उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेसाठी सुमारे १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपयांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून, यासंदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, दप्तर खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात येणार असून, शासनाच्या प्रचलित खरेदी नियमावलीनुसार पारदर्शक पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येईल. दप्तरांच्या किमतीमध्ये डिझाइन, पुरवठा, वाहतूक आणि जीएसटीसह सर्व बाबींचा समावेश असेल. या योजनेसाठी आवश्यक निधी वितरणाबाबतचे स्वतंत्र आदेश नंतर जारी करण्यात येतील.

विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती, शैक्षणिक सहभाग आणि शिक्षणासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असून, राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. शासन निर्णयाद्वारे यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

धावपटू खेळाडूंचा जंगी सत्कार समारंभ संपन्न

काटोल/ प्रशांत पवार

हरिहर सत्संग मंडळ आनंदगड चिखलगड येथे कमेटीच्या वतीने धावपटू खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

१५ ऑगस्ट २०२६ स्वतंत्र दिनाच्या औचित्य साधून ठाणेगावं ते श्री हनुमान मंदिर जामसावळी (८०) किलोमीटर अंतर निश्चित देवासे (ठाणेगावं), श्रेयश नागतुरे (ठाणेगावं), महेश सोहतिया (चिखलगड)या खेळाडूंनी ०७:३० साडेसात तासात पार केले.म्हणून हरिहर सत्संग मंडळाचे अध्यक्ष प्रल्हादजी बालपांडे,प्रेमकुमारजी गाखरे, संदीप घागरकर, रमेशर मुन्ने, सतीश चौहान, लीलाधर सोहतिया, माजी पोलीस पाटील साहेबराव गुजर, राधेशाम कुमेरिया या मान्यवरांच्या हस्ते तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत खेळाडूंचा सत्कार समारंभ संपन्न झाला. या सत्कार कार्यक्रमाने बाकी खेळाडूंचे मनोबल उंचाऊन खेळ भावनेला प्रोत्साहन मिळेल अशी भावना उपस्थितांनी बोलून दाखविली

नांदगाव ग्रामपंचायतीच्या आमसभेत गदारोळ; सरपंच थोडक्यात बचावले

सेलू/ प्रशांत झाडे

हिंगणघाट : नांदगाव ग्रामपंचायतीमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या आमसभेदरम्यान चांगलाच गदारोळ झाल्याची घटना घडली. यावेळी सरपंच नीलिमा हेमंत पोगले यांच्याशी वाद झाल्याने हा गोंधळ निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अमोल उमाड, कोमल गिरसावले, अंकित दारंडे व रोशन जुमडे यांनी आमसभेत सरपंचांसोबत आमचे भागात मुरूम टाकला नाही यावरून वाद घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा वाद एवढा विकोपाला गेला की या प्रकारात सरपंच नीलिमा हेमंत पोगले थोडक्यात बचावल्याचे सांगण्यात येते.घटनेदरम्यान ग्रामपंचायत कर्मचारी अजय मानकर ,मुले यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. आमसभेत अचानक झालेल्या या गदारोळामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या घटनेबाबत विस्तृत माहिती संबंधितांकडून मिळाली नाही याबाबत सरपंच व ग्राम कर्मचाऱ्यांकडून पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे .



महानुभाव पंथाचे प्रचारक राजेंद्र अंजनकर यांचे निधन

शोक सभेत पाणावलेल्या डोळ्यांनी वाहिली उपस्थितांनी श्रध्दांजली

काटोल/ प्रशांत पवार

नागपूर येथील लाव्हा दाबा येथे स्थित झालेले राजेंद्र अंजनकर यांची तब्बेत पिक्स कंपनीत कर्तव्यावर असतानाच काही दिवसा आधी बिघडली सोबत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी धावाधाव करून त्यांना कंपनीच्या रुग्णवाहिकेने रुग्णालय भरती केले व तातडीने त्यांच्या मेंदूचे ऑपरेशन करावे लागले व खाजगी रुग्णालयात नागपूर येथे त्यांचा उपचार सुरू होता परंतु लाखो रुपये खर्चून सुद्धा त्यांचे प्रकृतीत सुधारणा होत नव्हती उधार उसने घेऊन घरच्यांनी त्यांच्या प्रकृतीला पैसे लावले प्रसंगीत प्रसंगी पैसे संपल्यावर त्यांना शासकीय रुग्णालय नागपूर येथे भरती करण्यात आले व तेथेच त्यांना अटॅक येऊन त्यांची प्राणज्योत मावळली राजेंद्र अंजनकर यांचे निधन रोज मंगळवार ला दिनांक १८ ऑगस्ट रोजी सकाळी झाल्याची बातमी कळताच त्यांच्या कंपनीतील कर्मचारी यांनी व आप्तस्वयींनी त्यांच्या घराकडे धाव घेतली अत्यंत चावरे,. पुण्याजी बेठेकर आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते कु. राणी सिडाम हिचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून राणीच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि उल्लेखनीय यशाचे भरभरून कौतुक केले. राणीने भविष्यात प्रशासकीय अधिकारी होऊन समाजाची सेवा करावी, अशा शुभेच्छाही मान्यवरांनी व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रफुल बाघ यांनीकेले, तर आभार प्रदर्शन डांगेस यांनी केले.राणीच्या यशाने आज एक सुंदर संदेश दिला आहे—

परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वप्नांमध्ये प्रामाणिकपणा आणि मेहनतीची ताकद असेल, तर यशाची दारे नक्कीच उघडतात.आज राणीला मिळालेली ही साथ तिच्या भविष्यातील यशाची पायाभरणी ठरो आणि उद्याहीच राणी प्रशासकीय अधिकारी बनून असंख्य गरजू विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरो.



मनमिळाव स्वभावाचे व गरजूंना मदत करण्याची सवय असल्यामुळे ते लोकांमध्ये अत्यंत प्रिय व्यक्तिमत्व म्हणून गणल्या जात होते त्यांना त्यांच्या कंपनीतील कर्मचारी आदराने गुरुजी असे संबोधित होते मनभाव प्रचारक म्हणून सुद्धा त्यांनी मोलाचे योगदान दिले अशा या व्यक्तिमत्त्वाचे निधनाच्या वेळी शोकसभेत त्यांचे मित्र परिवार व कर्मचारी यांचे डोळे श्रद्धांजली देतेवेळी पाणावले होते त्यांच्या पश्चात आई पत्नी एक मुलगा व मुलगी भाऊ असा आप्त परिवार आहे.

जिल्ह्यात प्रथम आलेल्या कु. राणी सिडामचा स्व. लक्ष्मणराव मानकर आश्रमशाळेत दिमाखदार सत्कार

बक्षिसे, शिष्यवृत्ती व प्रेमाची बरसात १,१८,१०० रुपये.

सेलू/ प्रशांत झाडे

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत इयत्ता बारावी (कला शाखा) परीक्षेत ९१३ गुण मिळवून वर्धा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या कु. राणी संतोषराव सिडाम हिच्या यशाचा गौरव करण्यासाठी स्व. लक्ष्मणराव मानकर (गुरुजी) आदिवासी आश्रमशाळा, वडगाव (जंगली) येथे १५ ऑगस्ट रोजी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

राणीचे यश हे केवळ एका विद्यार्थिनीचे यश नसून, तिच्या आई-वडिलांच्या कष्टांचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे, शाळेच्या संस्कारांचे आणि तिच्या स्वतःच्या जिद्दीचे फलित आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या राणीने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर संपूर्ण वर्धा जिल्ह्यात आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल केले. तिच्या या यशामुळे आश्रमशाळेलाही जिल्ह्यातच नव्हे तर व्यापक स्तरावर एक वेगळी ओळख मिळाली आहे.

राणीच्या यशाचे कौतुक करण्यासाठी शाळेच्या वतीने ५१,००० चे बक्षीस देण्यात आले. तसेच जुनोना गावातील नागरिकांच्या वतीने ६६,००० चे बक्षीस देऊन तिच्या पाठीशी गाव भक्कमपणे उभे असल्याचे दाखवून दिले.वावळी डॉ. प्रशांत कडू, नागपूर यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राणीला दरमहा १,००१ प्रमाणे एक वर्षासाठी शिष्यवृत्ती जाहीर केली. शिक्षणाच्या वाटेवर राणीला मिळालेली ही मदत तिच्या भविष्यातील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.कलारंग ट्रॅव्हल्सचे श्री प्रशांत वाघमारे यांच्या वतीने राणीला महागडी ट्रॅव्हलिंग बॅग व १,१०० चे बक्षीस देण्यात आले. तसेच प्रा. प्रफुल बाघ यांच्या वतीने स्मार्ट वॉच व १०,००० चे बक्षीस देऊन राणीच्या यशाचे कौतुक करण्यात आले.

राणीच्या यशाच्या निमित्ताने तिच्यावर अक्षरशः बक्षिसांची, शुभेच्छांची आणि प्रेमाची बरसात झाली. प्रत्येक मदतीमागे राणीच्या गुणवत्तेवर असलेला विश्वास आणि तिच्या भविष्यातील स्वप्नांना मिळालेली साथ दडलेली आहे.सध्या राणी फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे शिक्षण घेत असून भविष्यात प्रशासकीय अधिकारी बनण्याचे स्वप्न ती उराशी बाळगून आहे. परिस्थितीने तिची परीक्षा घेतली; मात्र राणीने परिस्थितीसमोर हार न मानता आपल्या मेहनतीने उत्तर दिले. तिच्या या जिद्दीला मिळालेली समाजाची साथ तिच्या स्वप्नांना नवी ऊर्जा देणारी ठरली आहे.

'राणीच्या हातात दिलेले बक्षीस हे केवळ पैशांचे नाही, तर तिच्या स्वप्नांवर समाजाने ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.' या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष प्रेषिता कनेर होत्या. यावेळी श्री. विलास गिरे, सचिव, सौ. वर्षा कनेर, संचालक, शुभम जयाडे,. प्राचार्य नागदेवे सर, मुख्याध्यापक खेमराज भोंगे , गुणवंत डाखोळे, विशाल वाणी, प्रवीण भेंडे, पंकज



मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांना जलयुक्त शिवार ३.० मध्ये प्राधान्य मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना

निश्चित झालेल्या प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार
जलस्रोत बळकटीकरणासाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करण्याच्या सूचना



मुंबई : महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील.

मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीशी आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पाळळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठशांची नोंद न होणाऱ्या वयस्कर शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणीकरणाची विशेष सुविधा

'आपले सरकार' सेवा केंद्रातून प्रक्रिया
प्रमाणीकरण न झाल्यास तालुकास्तरीय समितीमार्फत ओळख निश्चिती

पुणे : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत वयस्कर तसेच बोटांच्या ठशांची नोंद होऊ न शकणाऱ्या शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विशेष प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना सहकार आयुक्त तथा सहकारी संस्था निबंधक दिपक तावरे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा उपनिबंधकांना दिल्या आहेत. राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ सुरू केली आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, महाआयटीमार्फत संगणकीय प्रक्रिया पूर्ण करून पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत १६.९६ लाख पात्र लाभार्थी असून, त्यापैकी १३.४८ लाख शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे.

वयस्कर शेतकऱ्यांना किंवा बोटांच्या ठशांची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरणात अडचणी येत असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी यादीतील विशिष्ट क्रमांकासह जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात आधार कार्ड व बँक पासबुक सोबत घेवून जावे. यादीतील विशिष्ट क्रमांक अथवा आधार क्रमांकाद्वारे पोर्टलवर कर्जाबाबतची माहिती पाहून मान्य अथवा अमान्य पर्यायाची नोंद केल्यानंतर बोटांच्या ठशांद्वारे प्रमाणीकरण करण्यात येईल.

एका बोटाचा ठसा उमटत नसल्यास वेगवेगळ्या बोटांनी किमान तीन वेळा प्रमाणीकरणाचा प्रयत्न करावा. त्यानंतरही प्रमाणीकरण न झाल्यास 'प्रमाणीकरण शक्य नाही' हा पर्याय सेवा केंद्र चालकाने निवडावा. त्यानंतर सेवा केंद्र चालक स्वतःच्या बोटाद्वारे आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित तक्रार तहसीलदार यांच्याकडे ऑनलाइन पाठविण्यात येईल. संबंधित शेतकऱ्याने तहसील कार्यालयात आधार कार्ड, बँक पासबुक, ७/१२ उतारा आदी स्वतःची ओळख निश्चित करणारी कागदपत्रे सादर करावीत.

तालुकास्तरीय समितीमार्फत कागदपत्रांची पडताळणी करून व्यक्तीची ओळख निश्चित केली जाईल. संबंधित व्यक्तीचा आधार क्रमांक योग्य असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर समितीमार्फत तक्रार मान्य करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र वयस्कर तसेच बोटांच्या ठशांची नोंद होऊ न शकणाऱ्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात योजनेच्या निकषांनुसार कर्जमुक्तीच्या लाभाची रक्कम ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण वरील प्रक्रियेनुसार तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश सहकार आयुक्त तथा सहकारी संस्था निबंधक दिपक तावरे यांनी दिले आहेत.

वाघाच्या हल्ल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांचा वनविभागावर धडक मोर्चा



आष्टी (शहीद) : नरसिंगपूर शिवारात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या निषेधार्थ आज नगरसेवक ?ड मनिष टोंबरे यांच्या नेतृत्वात सर्व शेतकऱ्यांच्या वतीने वनविभाग कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी चार दिवसांच्या आत वाघाला पकडून जेरबंद करावे, अन्यथा वनविभाग कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

यावेळी आमदार सुमित दादा वानखेडे यांच्या सोबत फोनवर शेतकऱ्यांनी संवाद साधला असता माननीय आमदार यांनी सांगितले की या विषयावर नुकतीच मुंबई येथे बैठक झाली असून लवकरच वाघाला जेरबंद करण्याची परवानगी शासन निर्गमित करेल असे आश्वासन दिले. तसेच वर्धा अइध यांनी फोन वर झालेल्या संभाषणातून वाघाला जेरबंद करे प्रयत्न वन विभागातील कर्मचारी त्या शिवारात २४ तास गस्तीवर राहील असे आश्वासन दिले.तसेच जंगल परिसराला फेंसिंग करून शेतकरी व शेतीमालाच्या सुरक्षेची ठोस हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या आंदोलनाला परिसरातील सुभाष मोकडूम अन्सार शेख नरेंद्र भनेरकर उत्तम बरगे सागर ढोले मंगेश बालपांडे मंगेश बालपांडे राहुल कठाने विलास बाणाइत कैलास आडे प्रमोद पाटील शेषराव भोयर आवेज खान बबलू बोराडे अशोक पाटणे सागर सिनकर दिगंबर मोकडदम विलास रघटाटे वसंत पोटे मारुती कुंभारे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आता ठोस कार्यवाही होणे आवश्यक आहे.

रानडुकराची मोटार सायकलला धडक; एकाचा मृत्यू तर एक गंभीर

मोझरी (शेकापूर) : कापसीकडून मोझरीकडे येत असताना दुचाकीला रानडुकरांनी जबर धडक दिली. या धडकेत माधव क्षीरसागर(वय ५०) रा. मोझरी(शेकापूर) यांचा मृत्यू झाला तर मोटर सायकल चालक संजय सातपुते (वय४९) रा. पोटी गंभीर जखमी झाले. ही घटना काल मंगळवारी(दि. १८) सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास कापसी जवळ घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, संजय रामराव सातपुते रा. पोटी आणि माधव मारुती क्षीरसागर हे दोघेही कापसी कडून मोझरी कडे एम एच ३२ के ४८६९ या क्रमांकाच्या मोटरसायकलने डबल सीट येत असताना अचानक रानडुकरांनी मोटरसायकलला जबर धडक दिली. या धडकेत दोघेही खाली कोसळले असून त्या दोघांनाही डोक्याला जबर दुखापत झाली होती. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी सरकारी दवाखाना राळेगाव येथे हलविले. मात्र, दुखापत गंभीर असल्याचे बघून डॉक्टरांनी त्यांना यवतमाळच्या रुग्णालयात पाठविले. उपचार सुरू असताना दुचाकीवर मागे बसलेले माधव क्षीरसागर यांचा रात्री दोन वाजताच्या सुमारास मृत्यू झाला. तर मोटरसायकल चालक संजय सातपुते यांचेवर उपचार सुरू आहे.

रोख रक्कमेसह मोबाईल चोरीचा दोन तासात छडा

सावंगी (मेघे) पोलिसांची कारवाई



वर्धा : बँगमध्ये लाखो रुपये असल्याच्या संशयावरून बँग, मोबाईल घेऊन कारने पसार झाले. पोलिसांनी अवघ्या दोन तासांत घटनेचा शोध घेत आरोपीना अटक केली.

चारमंडळ येथील फिर्यादी युवक प्रेयसीला सोबत घेऊन रोठा शिवारात कियाच्या पोल्ट्री फॉर्ममधील रूममध्ये गेला. यादरम्यान मागावून आलेल्या अनोळखी ३ इसमांनी मोबाईल, रोख रक्कम आदी १५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला. मैत्रीण आणि ३ इसम रूम बंद करून कारने पळून गेले. याप्रकरणी तक्रारीवरून सावंगी (मेघे) पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला. पोलिसांनी दोन तासांत गुन्ह्याचा शोध लावला. फिर्यादीची मैत्रीण निलीमाने गुन्हा केल्याची माहिती पुढे आल्याने तिचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आली. पोलिसांनी शिवाशीश अशोक सराटे, सुरज सुरेशराव मुंडेकार, दर्शन अनिल दाहाटे सर्व रा. वरूड, सेवाग्राम या तिघांनाही अटक केली.

-- आरोपीनी बँगमध्ये लाखो रूपये असेल या लालसेपोटी बँग चोरी केली. परंतू बँगमध्ये कागदपत्रे मिळून आल्याने कागदपत्रे रागाच्या भरात जाळून टाकल्याचे पुढे आले. वाहन, मोबाईल, बँग, ३ हजार रुपये असा १ लाख ८३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

-- ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक विनोद गिरी, हेड कॉन्स्टेबल संजय पंचभाई, विरेंद्र कांबळे, अनिल वैद्य, गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आली. पोलिसांनी शिवाशीश अशोक सराटे, दर्शन अनिल दाहाटे सर्व रा. वरूड, सेवाग्राम या तिघांनाही अटक केली.

महाकाली देवस्थानच्या विकासासाठी ५० कोटींच्या निधीची मागणी



जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; महाविकास आराखड्यासाठी निधी देण्याची मागणी

वर्धा : 'दक्षिणेची काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाकाली देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जय महाकाली सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष पंडित शंकरप्रसाद अग्निहोत्री यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर केले.

महाकाली देवस्थान परिसरात देवीची ५१ शक्तिपीठे, चारधाम, १२ ज्योतिर्लिंग, अष्टविनायक, ज्योतिसर, राममंदिर, शिवमंदिर, हनुमान मंदिर आणि गोशाळेसह विविध धार्मिक व आध्यात्मिक केंद्रांची निर्मिती प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक साडेपाच एकर जमीन पंडित शंकरप्रसाद अग्निहोत्री यांनी महाकाली देवस्थानला दान दिली आहे.

प्रस्तावित विकासकामांसाठी ५० कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून, तो जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यापूर्वी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निधीची मागणी करण्यात आली होती. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करून शासनाकडे पाठविण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना महाकाली देवस्थान विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

यावेळी मिलिंद केदार, डॉ. जी. आर. जंगमवार, अभिजीत रघुवंशी, गजानन पोकळे आणि गणेश काळे उपस्थित होते.

राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांना सुरक्षित शासकीय इमारत, पोषणयुक्त आहार व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्या; आयटकची मागणी



वर्धा : अंगणवाडी केंद्रे ही राज्यातील लाखो बालकांच्या भविष्याची पायाभरणी करणारी केंद्रे आहेत. त्यामुळे तेथे येणाऱ्या बालकांना सुरक्षितता, पोषण, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा मिळणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी आहे. नुकतीच भंडारा येथील दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये यासाठी शासनाने केवळ आश्वासन न देता तातडीने ठोस व परिणामकारक उपाययोजना कराव्यात.बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करून दोषींना कायद्यानुसार फाशीची शिक्षा मिळावी आणि राज्यातील प्रत्येक अंगणवाडी केंद्र बालकांसाठी सुरक्षित, सुसज्ज आणि पोषणयुक्त करण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन आयटक सलग्न महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियन त्या वतीने शासन आणि प्रशासनाला देण्यात आले आहे

भंडारा येथे नुकतेच अंगणवाडी केंद्रात बालिकेवर अत्याचार झाल्याची घटना अत्यंत गंभीर, संतापजनक आणि मानवतेला काळिमा फासणारी आहे. अंगणवाडी केंद्रे ही बालकांच्या संगोपन, पोषण, आरोग्य व पूर्वप्राथमिक शिक्षणासाठीची सुरक्षित ठिकाणे असणे अपेक्षित आहे. अशा ठिकाणी बालिकेवर अत्याचार होणे ही अत्यंत चिंताजनक बाब असून, या घटनेमुळे पालकांमध्ये व समाजामध्ये तीव्र संताप व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

या घटनेतील आरोपीना कोणतीही सवलत न देता कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा, तसेच दोष सिद्ध झाल्यास फाशीची शिक्षा देण्यासाठी शासनाने सक्षम कायदेशीर कार्यवाही करावी, अशी आमची ठाम मागणी आहे. बालकांच्या सुरक्षिततेशी कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ नये.

त्याचबरोबर या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांची तातडीने सुरक्षा तपासणी करून बालकांसाठी सुरक्षित व सुसज्ज वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

आमच्या प्रमुख मागण्या :

१)भंडारा येथील अंगणवाडी केंद्रातील बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपींवर जलदगतीने खटला चालवून दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा व फाशीची शिक्षा देण्यासाठी शासनाने ठोस कार्यवाही करावी.

२) राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये बालकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षित व स्वतंत्र शासकीय इमारती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात.

३)ज्या अंगणवाडी केंद्रांना अद्याप स्वतःची इमारत नाही, त्यांच्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून शासकीय अंगणवाडी इमारतींचे बांधकाम पूर्ण करावे.४) सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वीज, पंखे, पुरेसा प्रकाश, सुरक्षित दरवाजे-खिडक्या, संरक्षक भिंत/कुंपण इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

५) अंगणवाडी केंद्रांमध्ये येणाऱ्या बालकांना शासनाच्या निकषांनुसार दर्जेदार, पौष्टिक व पुरेसा आहार नियमितपणे उपलब्ध करून द्यावा. आहाराच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करावी.

६) प्रत्येक अंगणवाडी केंद्राची सुरक्षा ऑडिट करून धोकादायक किंवा असुरक्षित इमारतींची तातडीने दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करावी.

७)अंगणवाडी केंद्रांमध्ये बालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या ठिकाणी ण्ण्ऊ कॅमेरे व इतर सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्याव्यात.८)अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना बाल संरक्षण, लैंगिक अत्याचार प्रतिबंध, आपत्कालीन परिस्थिती हाताळणी आणि बालकांच्या सुरक्षेबाबत नियमित प्रशिक्षण देण्यात यावे.

९)अंगणवाडी केंद्रातील बालकांच्या सुरक्षिततेसाठी स्थानिक प्रशासन, महिला व बाल विकास विभाग आणि पोलीस विभाग यांच्या समन्वयाने सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी.१०) राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांची जिल्हानिहाय पाहणी करून आवश्यक सोयी-सुविधांचा अहवाल तयार करावा आणि त्यानुसार तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.

११)अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेली सुरक्षा साधने, प्राथमिक उपचार पेटी व आपत्कालीन संपर्क व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

१२)बालकांना दर्जेदार पोषण मिळावे यासाठी अंगणवाडीतील पोषण आहाराच्या गुणवत्तेवर नियमित देखरेख व पारदर्शक तपासणी व्यवस्था निर्माण करावी.

१४)अंगणवाडी केंद्रे ही बालकांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी वातावरणाची ठिकाणे बनविण्यासाठीविशेष निधीची तरतूद करावी.१५) बालविकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत सर्व रिक्त पदे त्वरित भरा १६) अहिल्यानगर जिल्ह्यातील अंगणवाडी चिचोडी पाटील या अंगणवाडी केंद्रात जाऊन सेविका उमा पवार यांच्यावर अमानुष अत्याचार करून त्याचा खून करण्यात आला त्या आरोपीला तात्काळ फाशी द्या.